रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ११७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मुख्यमंत्र्यांच्या दारावर मोर्चा

**ठाणे :** मागील १२ वर्षांपासून ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या ग्रामपंचायत संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे या प्रमुख मागणीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या ठाणे येथील निवासस्थानावर मंगळवारी (दि. २४) मोर्चा काढण्यात आला होता. कोर्टनाका परिसरात या हजारो संगणक परिचालकांना रोखण्यात आले आहे. पण, शासन जोपर्यंत निर्णय घेणार नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचा निर्धार संघटनेचे राज्य अध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी व्यक्त केला. २९ हजारांहून अधिक परिचालक मोर्चात सहभागी झाले आहेत.


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹








५वी ते ९वीच्या मराठी/सेमी इंग्लिश विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट सर्च'

MKCL OLYMPIAD MOVEMENT

प्रवेशाची अंतिम तारीख दि. ३० सप्टेंबर

सर्व विषयांच्या पहिल्या सत्राचा अभ्यासक्रम व व्यक्तीमत्व विकास यावर आधारित १ तासाची परीक्षा

इयत्तावार परीक्षा व आकर्षक बक्षिसे

www.mkcl.org/mom

परीक्षेसाठी नजीकच्या MS-CIT/ क्लिक् सेंटरमध्ये नोंदणी करा 8956537496


**आजचा अग्रलेख**

**एक मेला, शंभर सुटले**

## वेधक

### एन्काऊंटरचा तपास सीआयडीकडे

**ठाणे :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी पोलिसांनी एन्काऊंटर केला. याप्रकरणी विरोधकांनी प्रश्न उपस्थित केल्यामुळे एन्काऊंटरचा तपास सीआयडी करणार आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीने सुरु केला असून, सीआयडी अधीक्षक, नवी मुंबई हे तपासाचे प्रमुख असणार आहेत.

### मुरुड दगडफेक प्रकरणी गुन्हा दाखल

**अलिबाग :** मुरूड तालुक्यातील भोगश्वर पाखाडी येथे गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान दोन अल्पवयीन मुलांनी दगड मारले म्हणून व त्यांना प्रवत्त करणाऱ्या त्यांच्या आईविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १२ सप्टेंबर रोजी घडली होती. या गुन्हयाच्या तपासमध्ये महिला आरोपीला नोटीस देण्यात आली असून, अधिकचा तपास पान २ वर

# लंका वानरानेच जाळली

## राजा केणींसह आमदार दळवींना दिलीप भोईर यांचा इशारा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

भाजपचे दिलीप भोईर यांनी माकड चाळे थांबवावे, असे वादग्रस्त वक्तव्य शिंदे गटातील जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी केले होते. श्रीराम सेतू वानरांनीच बांधला आणि रावणाची लंकादेखील वानरांनीच जाळली, असा टोला दिलीप भोईर यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात राजा केणी यांच्यासह आमदार महेंद्र दळवी यांना लगावला. आगामी विधानसभेच्या निवडणुकीत आमदार दळवी हे अपयशी ठरणार आहेत, असा इशारादेखील त्यांनी दिला आहे. त्यामुळे आगामी काळात शिंदे गट आणि भाजपामध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात आदिवासी ठाकूर समाज मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांनी दळवींना निवडून दिले. परंतु, त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास आमदार अपयशी ठरले आहेत. पाच वर्षांत हा समाज विकासापासून वंचित राहिला आहे. फक्त बॅनरबाजी करून जनतेची फसवणूक केली जात आहे. विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी पान २ वर



### टक्केवारीतून स्वतःचा फायदा

अलिबाग, मुरूड मतदारसंघातील विकासकामांसाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी आणला आहे, असा दावा आमदार करीत आहेत. परंतु, आजही अलिबाग, मुरुडसह रोहा तालुक्यातील गावे, वाड्या पाणी, रस्ता व अन्य सोयी सुविधांपासून वंचित आहेत. फक्त टक्केवारी काढून स्वतःचा फायदा साधण्याचे काम लोकप्रतिनिधींकडून केले जात आहे. निधी मंजूर केल्याचे बॅनर लावले जात आहेत. प्रत्यक्षात मात्र काम काहीच दिसून ये त नाही, अशी खरमरीत टीका दिलीप भोईर यांनी केली.

### 'उमटे'चा गाळ काढण्याकडे दुर्लक्ष

अलिबाग तालुक्यासह अन्य तालुक्यांतील गावे, वाड्यांना पाणीपुरवठा होऊ शकतो, इतके मोठे उमटे धरण आहे. धरणातील गाळाचा प्रश्न गंभीर आहे. तो सोडविण्याऐवजी विद्यमान आमदारांनी धरणात पाईपलाईन टाकण्यासाठी निधी मंजूर केला आहे. परंतु, गाळ काढण्यासाठी निधी मंजूर करण्याकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष झाल्याचा घणाघात भोईर यांनी केला. धरणात पाणी मुबलक असेल तरच पाईपद्वारे पाणीपुरवठा केला जाईल, असा टोलाही भोईर यांनी आ. दळवींना लगावला.

# मुलांची सुरक्षा ही शाळांची जबाबदारी

- **राज्य सरकारांना न्यायालयाने फटकारले**
- **मुख्य सचिवांना मार्गदर्शक तत्त्वांची प्रत**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

देशभरात लहान मुलांवरील लैंगिक छळाच्या घटना वाढल्या आहेत. दरम्यान, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा सर्व राज्य सरकारांवर ताशेरे ओढले. महाराष्ट्रातील बदलापूरसह देशातील विविध ठिकाणी घडलेल्या बालकांच्या लैंगिक छळाच्या घटनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांची प्रत सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठवण्यास सांगून तात्काळ अंमलबजावणी करावी, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये मुलींच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरथना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. बचपन बचाओ आंदोलन या 'एनजीओ'ने ही याचिका दाखल केली आहे. सुनावणीनंतर न्यायालयाने राज्यांच्या मुख्य सचिवांना आदेश देत बचपन बचाव आंदोलनाबाबत दिलेला आदेश पाळावा, असे म्हटले आहे. 'मुलांची सुरक्षा ही शाळांची जबाबदारी आहे, त्यासाठी उपाययोजना कराव्यात' असे न्यायालयाने म्हटले आहे.

# 'जलजीवन'चे पाणी घराघरात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबावणी करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील ५ लाख ४८ हजार ६२० कुटुंबांपैकी ४ लाख ७१ हजार ८२६ कुटुंबांना नळ कनेक्शन देण्यात आले असून, या कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे. विशेष म्हणजे, उरण, म्हसळा, खालापूर तालुक्यातील १०० टक्के कुटुंबांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे.



- **पावणे पाच लाख कुटुंबांना मिळाली नळ कनेक्शन**

केंद्र सरकारने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. या अंतर्गत प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. या योजनेच्या माध्यमातून सुरुवातीला ज्या घरांमध्ये नळ कनेक्शन आहे, त्या घरांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ज्या घरांमध्ये वैयक्तिक नळ कनेक्शन नाही अशा घरांना नळ कनेक्शन देण्यात येत आहे. आत्तापर्यंत जिल्ह्यात ८६ टक्के कुटुंबांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. पान २ वर

जिल्ह्यात जलजीवन मिशन यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.पी. वेंगुर्लेकर, पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहेत.

# विमान लँडिंगचा मुहूर्त ठरला!

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम वेगाने सुरु आहे. या विमानतळावरुन लवकर विमानांचे उड्डाण होणार आहे. ५ ऑक्टोबरला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळाच्या धावपट्टीवर विमानाची पहिली लँडिंग टेस्ट होणार आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या विमानतळावर ४ टर्मिनल आहे. त्या ठिकाणी जवळपास ३५० विमाने एकाच वेळी पार्क करता येतील एवढी क्षमता आहे. पान २ वर

# ११३ गावांचा होणार कायापालट

## आदिवासींच्या विकासासाठी प्रधानमंत्री उन्नत ग्राम अभियान

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

आदिवासी बांधवांना विकासाच्या वाटचालीत मुख्य प्रवाहासोबत आणण्याच्या व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून यावा या उद्देशाने प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील ११३ गावांचा समावेश आहे. या अभियानाचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील शासकीय आणि वसतिगृहांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच सिकलसेल आजाराच्या निदानासाठी अत्याधुनिक सुविधा असलेले क्षमता केंद्र स्थापन करण्यात येईल. हे अभियान जिल्ह्यातील असुरक्षित समुदायाच्या कल्याणासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचणारी सहकारी संघराज्य व्यवस्था आणि संपूर्ण सरकार या दृष्टीकोनाचे आगळे वेगळे उदाहरण ठरेल, असे जावळे यांनी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री उन्नत ग्राम अभियानात १७ मंत्रालयांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. प्रत्येक मंत्रालय, विभाग पुढील पाच वर्षात उद्दिष्टे निश्चित करून त्यांची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करेल.

या अभियानांतर्गत आदिवासी बांधवांसाठी सक्षम पायाभूत सुविधा विकसित करण्याचे ध्येय समाविष्ट आहे. त्यासाठी आदिवासी बांधवांना पक्के घर देणे, बारमाही रस्ते बांधणे, जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरामध्ये नळाची पान २ वर




# तरुणाई ऑनलाईन लॉटरीच्या विळख्यात

## अनेक तरुणांचे आयुष्य बरबाद केलेली लॉटरी पुन्हा तेजीत

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

शो युवर स्किलअसे आवाहन करून तरुणांना ऑनलाईन लॉटरीच्या विळख्यात ओढण्याचे काम सध्या नवी मुंबई-पनवेल परिसरात सुरु आहे. ऑनलाईन लॉटरीच्या नावावर सुरु असलेल्या या जुगार अड्ड्यांवर लॉटरी खेळण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत असून, पोलीस प्रशासन मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याने लॉटरी विक्रेत्यांचे फावले आहे.

ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. कर्जबाजारीपणामुळे अनेकांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले आहे. यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत सुरु असलेली दुकाने यापूर्वी बंद करण्यात आली होती. पोलिसांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे अनेकांची कुटुंबं उद्ध्वस्त होण्यापासून वाचली होती. आता मात्र बंद असलेली ही दुकाने पुन्हा सुरु करण्यात आल्याने दुकान बंद झाल्यामुळे आनंदी झालेल्या कुटुंबांवर पुन्हा एकदा उद्ध्वस्त होण्याचे सावट निर्माण झाले असून, राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनाने दखल घेऊन सुरु झालेली दुकाने कायमस्वरूपी बंद करावीत, अशी मागणी झटपट श्रीमंत होण्याच्या नादात उद्ध्वस्त झालेल्या व्यक्तींचे कुटुंबीय करत आहेत.



झटपट श्रीमंत होण्यासाठी किंवा शॉर्टकट पद्धतीने पैसे कमविण्यासाठी काहीजण ऑनलाईन लॉटरीचे तिकीट काढत असतात. पण, अनधिकृत ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांमुळे कित्येकांचे संसार धुळीस मिळाले आहेत. दोन आकडी आणि पंधरा मिनिटांत रिझल्ट यामुळे सामान्य माणूस या लॉटरी सेंटरकडे आकर्षित होतो; पण त्यांच्या पदरी निराशाच येते. परिणामी, कित्येकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

शहरात साधारणतः २०० अनधिकृत लॉटरीचे सेंटर असून, महिन्याला लाखोंचा व्यवसाय या सेंटरमध्ये होतो.

समाजातील मटका व जुगार या व्यसनांना प्रतिबंध घालून त्यातून होणाऱ्या जनसामान्यांची फसगत टाळण्यासाठी १९६९ साली राज्य वित्त विभागाने महाराष्ट्र राज्य लॉटरीची स्थापना केली. यामुळे बेरोजगार तरूणांना व्यवसायाची संधी उपलब्ध झाली. या लॉटरी व्यवसायावर सरकारकडून २८ टक्के जी.एस.टी. आकारण्यात आला. त्यामुळे लॉटरीची व्यवसायाला मंदीची झळ बसली. आणि बरेच व्यवसाय बंद पडले. याचाच फायदा घेऊन अनधिकृत ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांनी जागोजागी आपली दुकाने सुरू केली. अकरा रूपयांपासून सुरू होणारे तिकिटांची लाखोंची उलाढाल होते. अगदी सहज उपलब्ध होणारे आणि पंधरा मिनिटांत रिझल्ट यामुळे सामान्य माणूस तेथे सहज आकर्षिला जातो. आणि जिंकण्याऐवजी तो स्वतःकडचे सर्व रूपये गमावून बसतो. मग गमावलेले रूपये परत मिळण्यासाठी कर्ज करून बसतो. आणि कर्ज चुकविण्यासाठी आत्महत्या हा शेवटचा पर्याय त्याच्यासमोर राहतो.

### गुमास्ता परवाना

महाराष्ट्र राज्यात कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी आहे. हे महाराष्ट्र राज्य दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत महानगरपालिकेद्वारे नियंत्रित केले जाते. हे एक प्रमाणपत्र आहे जे तुम्हाला विशिष्ट ठिकाणी तुमचा व्यवसाय करण्याचे अधिकार प्रदान करते. हा परवाना तुमच्याकडे नसल्यास नगरपालिकेकडून दंड आकारण्यात येतो. हे लॉटरी सेंटर एखाद्या विभागात एक छोट्याशा दुकानात विनापरवाना किंवा विनाबोर्ड लावता हा व्यवसाय सुरू करतात. यांच्यावर महापालिकेतर्फे कोणतीही कार्यवाही केली जात नाही.

### पोलीस प्रशासनाचा कानाडोळा

हे लॉटरी सेंटर एकप्रकारचा जुगाराचा अड्डाच आहेत. यामुळे कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. कित्येकांना आपला जीव गमावला आहे. तरीही पोलीस प्रशासन या व्यवसायाकडे कानाडोळा करत आहे. नवी मुंबई परिसरात सध्या विन गेम आणि प्ले लॉटरीच्या नावावर ऑनलाईन जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून, लॉटरीचे तिकिट खरेदी करताना आम्ही आमच्या जबाबदारीवर हा खेळ खेळत असल्याचा उल्लेख छापून ही तिकिटे विकली जात आहेत.

# डिझेलतस्करी जोरात

**। उरण । वार्ताहर ।**

उरण परिसरातील समुद्रकिनारी डिझेल व तेलाची तस्करी खुलेआम सुरू आहे. शासकीय यंत्रणेकडून कारवाई होताना दिसत नाही. तरी, या माफियांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. जेएनपीटी बंदरात येणाऱ्या परदेशी जहाजातील कर्मचाऱ्यांशी संधान बांधून समुद्रकिनाऱ्यापासून दूर काही नॉटिकल मैल अंतरावर उभ्या राहणाऱ्या जहाजातील डिझेल छोट्या बोटीत उतरवून खाडी मार्गाने तस्करी करण्याचे काम मागील काही वर्षांपासून जोरात सुरु आहे. पोलीस, तटरक्षक दल यांना या तस्करीची माहिती असून, त्यांच्या आशीर्वादानेच व्यवसाय राजरोसपणे सुरु आहेत, असा स्थानिकांचा आरोप आहे. परदेशी जहाजातून जवळपास ३० रुपये लीटरने मिळणारे हे डिझेल बाजारपेठेत जादा दराने विक्री करून महसूल बुडवण्याचे काम हे तस्कर करतात, असे म्हटले जाते.

सध्या डिझेलच्या वाढत्या किमती पाहता, काळ्या बाजारातून गाडी व्यावसायिक डिझेल घेताना दिसत आहेत. पोलीस ठाण्यांचे सागरी मार्गाकडे दुर्लक्ष असल्याचेच दिसून येत आहे.

### कारवाईची मागणी

कारण, सर्रास खाडीच्या परिसरात डिझेलची तस्करी सुरू आहे. गेल्या १५ दिवसांत याचा ओघ वाढल्याचे दिसत आहे. हे समुद्र चाचे बाहेरून येणाऱ्या बार्जेसच्या चालकांकडून हजारो लीटर डिझेल घेत असतात आणि हे डिझेल साठवून ठेवतात. डिझेलच्या किमती वाढल्याने मोठ्या प्रमाणात या डिझेलला मागणी आहे.

उरण, पनवेल, वडखळ, नागोठणे या भागातील ट्रान्सपोर्टचा धंदा करणारे या समुद्र चाच्यांशी संपर्क करून, डिझेल खरेदी करत असतात. परंतु, वेळीच समुद्र चाच्यांवर बंधने घातली नाहीत, तर या मार्गाचा वापर अतिरेकी कारवाई करण्यासाठी भविष्यात झाल्यास नवल वाटू नये.

पोलीस खात्याचे सपशेल या बाबीकडे दुर्लक्ष आहे, असेच म्हणावे लागेल. पोलीस खात्याला २६/११ च्या हल्ल्याचा विसर पडल्याचे चित्र दिसत आहे. २६/११ च्या हल्ल्यासाठी उरण, (करंजा) जेट्टीचा वापर केल्याचे त्यावेळी उघड झाले होते. तरी या माफियांवर ठोस कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# रस्त्यावरील गवतामुळे अपघाताचा धोका

**। उरण । वार्ताहर ।**



तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम, सिडको तसेच विविध आस्थापनांच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर गवताचे साम्राज्य वाढल्याने अपघात होण्याचा धोका वाढला आहे. हे रस्त्यावर वाढलेले गवत संबंधित आस्थापनाने ठेकेदाराच्या माध्यमातून काढण्यात यावे, अशी मागणी जनतेतून होत आहे.

उरण तालुक्यात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असलेले बहुतांशी रस्ते हे उरणच्या पूर्व विभागाशी जोडलेले आहेत. उरण-पनवेल मार्ग, चिरनेर-आवरे मार्ग, खोपटा -केळवणे मार्ग या मार्गावरील रस्त्यावरील दोन्ही बाजूला साईटपट्टीवर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे. हे गवत एवढे वाढले आहे की गवताने अर्ध्यापेक्षा जास्त रस्ता व्यापला आहे. गवत वाढल्याने रस्ता पूर्ण आखूड झाला. त्यामुळे त्या रस्त्यावर दोन वाहने पास होणे मुश्किल झाले. तसेच समोरून येणारे वाहन या वाढलेल्या गवतामुळे दिसत नसल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच द्रोणागिरी नोड परिसरातील बहुतांशी रस्त्यावर खूप मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे. या गवतामुळे अपघात ही होण्याची संभावना नाकारता येत नाही, त्यामुळे या मार्गांवरील गवत लवकरात लवकर छाटण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर यांनी केली आहे. यासंदर्भात सिडकोच्या आस्थापनाकडे विचारले असता त्यांनी कामे सुरू असल्याचे सांगितले.

> ठेकेदाराला रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत काढण्यासाठी सांगितले आहे. लवकरच हे काम सुरु केले जाईल.
> – नरेश पवार, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम

# तालुकाध्यक्षपदी यशवंत भवारे

**नेरळ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून पक्षाचे तालुका उपाध्यक्ष यशवंत भवारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महेंद्र निगुडकर यांची पदावर उचलबांगडी करण्यात आली असून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर मनसेने तालुकाध्यक्ष बदलला असल्याने राजकीय वर्तुळात रंगली आहे. यशवंत भवारे यांच्याकडून नवीन शाखा उद्‌घाटनापासून अन्य पक्षातील कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशाची मालिका सुरु होईल, अशी अपेक्षा पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांना आहे. त्यामुळे भवारे यांच्यापुढे मोठे आव्हान असणार आहे.

# विद्यार्थिनीला निःशुल्क मिळाला दाखला

## मनविसेच्या ठिय्या आंदोलनानंतर प्रशासनास जाग

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्था, सातारा संचलित विद्यामंदिर पोलादपूर अंतर्गत शैक्षणिक संकुलातील इंग्लिश मीडियमच्या शाळेने दाखला देण्यासाठी शैक्षणिक शुल्क १२ हजार रूपये रकमेची मागणी करण्यता आली होती. याप्रकरणी पोलादपूर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या कार्यकर्त्यांनी पोलादपूर पंचायत समिती कार्यालयात ठिय्या आंदोलनाचा पवित्रा घेतला. त्यानंतर शैक्षणिक शुल्काविना शाळा सोडण्याचा दाखला द्यावा लागल्याची माहिती मनविसे तालुकाध्यक्ष ओंकार मोहिरे यांनी दिली.

शाळेकडून दाखला देत नसल्याने मुलीला शैक्षणिक वर्षात अद्याप प्रवेश मिळालेला नाही, अशी तक्रार घेऊन जाधव पतीपत्नी हे पालक पोलादपूर मनसे जनसंपर्क कार्यालयात आल्यावर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना पदाधिकारी यांनी संबंधित शाळेत जाऊन शाळेला दाखला देण्याची विनंती केली. पोलादपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील संबधित अधिकाऱ्यांकडे मनविसे पदाधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष देण्याची विनंती केली. यावर अधिकाऱ्यांनीदेखील टाळाटाळ केल्याने मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयातच ठिय्या देण्याचा निर्णय घेतला आणि विद्यार्थिनीचा दाखला मिळाल्याशिवाय उठणार नाही, अशी भूमिका घेतली.

त्यानंतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली आणि नियमबाह्य शैक्षणिक शुल्क २० हजार रुपयांसाठी अडवून ठेवलेला दाखला विद्यार्थिनीला कोणतीही रक्कम न भरता निःशुल्क मिळाला. यावेळी विद्यार्थिनीच्या पालकांनी महाराष्ट्र सैनिकांचे आभार मानले. पोलादपूर मनसे तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या आंदोलनामध्ये तालुकाध्यक्ष ओंकार मोहिरे, मनसे शहर उपाध्यक्ष प्रफुल्ल पांडे, तुषार पवार आदी सहभागी झाले होते.

पान १ वरून

## लंका वानरानेच जाळली

आणल्याचा दावा दळवी यांनी केला. परंतु, आजही अलिबाग, मुरूड मतदारसंघातील अनेक गावांना विकासाची प्रतीक्षा लागून राहिली आहे, असे टीकास्त्र भोईर यांनी डागले. स्वतःच्या फायद्यासाठी हे आदिवासी समाजाचा वापर करून घेत आहेत. फक्त निवडणुकीपुरतेच त्यांना विचारले जाते. इतर वेळेला त्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कामाचे ठेके घेणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावून निवडणुकीत काम करा, अन्यथा पुढच्या वेळेला काम देणार नाही, असे बोलले जात आहे. आगामी निवडणुकीत अपयश येण्याची भीती दळवींना वाटत आहे. त्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. अलिबाग तालुक्यासह अन्य तालुक्यांतील गावे, वाड्यांना पाणीपुरवठा होऊ शकतो, इतके मोठे उमटे धरण आहे. धरणातील गाळाचा प्रश्न गंभीर आहे. तो सोडविण्याऐवजी विद्यमान आमदारांनी धरणात पाईपलाईन टाकण्यासाठी निधी मंजूर केला आहे. परंतु, गाळ काढण्यासाठी निधी मंजूर करण्याकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष झाल्याचा घणाघात त्यांनी केला. धरणात पाणी मुबलक असेल, तर पाईपद्वारे पाणीपुरवठा केला जाईल, असा टोला आमदार दळवी यांना लगावत ते पुढे म्हणाले, अलिबाग, मुरूड मतदारसंघातील विकासकामांसाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी आणला आहे, असा दावा आमदार करीत आहेत. परंतु, आजही अलिबाग, मुरुडसह रोहा तालुक्यातील गावे, वाड्या पाणी, रस्ता व अन्य सोयी सुविधांपासून वंचित आहेत. फक्त टक्केवारी काढून स्वतःचा फायदा साधण्याचे काम लोकप्रतिनिधींकडून केले जात आहे. निधी मंजूर केल्याचे बॅनर लावले जात आहेत. प्रत्यक्षात मात्र काम काहीच दिसून ये त नाही, अशी खरमरीत टीका दिलीप भोईर यांनी केली.

श्रीराम सेतू वानरांनीच बांधला. रावणाची लंका वानरांनीच जाळली. त्यामुळे माकड चाळे थांबवा, असे बोलणाऱ्या राजा केणी यांनी हे लक्षात ठेवावे, असा टोला दिलीप भोईर यांनी लगावला. त्यामुळे आगामी निवडणुकीत भाजपकडूनच शिंदे गटाला दणका मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## मुरुड दगडफेकप्रकरणी गुन्हा

सुरू आहे. तसेच दोन्ही अल्पवयीन मुलांना बाल कल्याण समिती, पनवेल येथे हजर करण्यात आलेले आहे.

मुरूड शहरामध्ये सोशल मीडियाद्वारे हिंदू व्यापाऱ्यांवर बहिष्कार टाकण्याबाबत ध्वनीफीत प्रसारीत झाल्यासंदर्भात एका मुस्लीम महिलेविरूद्ध मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, त्या महिलेला तपासासाठी नोटीस देऊन बोलविण्यात आलेले होते. याबाबत सायबर कक्षाच्या सहाय्याने अधिकचा तपास सुरू आहे. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुरूड शहरात आवश्यक तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## ‘जलजीवन’चे पाणी घराघरात

जिल्ह्यात जलजीवन मिशन यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.पी. वेंगुर्लेकर, पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, कर्मचारी योग्य नियोजन करून योजना प्रभावीपणे राबवित आहेत.

**तालुका : कुटुंबे : नळ कनेक्शन दिलेली कुटुंबे : टक्के**
**अलिबाग : ७१ हजार ३६४ : ५६ हजार १३२ : ७८.६७**
**कर्जत : ५४ हजार ५०९ : ४१ हजार ७९९ : ७६.६८**
**खालापूर : ३६ हजार ४७ : ३६ हजार ४७ : १००**
**महाड : ४२ हजार ४९९ : ३६ हजार ९४१ : ८६.९२**
**म्हसळा : १४ हजार ५६५ : १४ हजार ५६५ : १००**
**मुरुड : १६ हजार ४२३ : १५ हजार २६५ : ९२.९५**
**पनवेल : ८१ हजार ८३० : ७२ हजार ६०५ : ८८.७३**
**पेण : ४५ हजार ६७ : २९ हजार १९५ : ६४.७८**
**पोलादपूर : १६ हजार ५०३ : १३ हजार २९७ : ८०.५७**
**सुधागड : १५ हजार ८६५ : १२ हजार ४४५ : ७८.४४**
**तळा : ११ हजार ४९१ : १० हजार ३९६ : ९०.४७**
**उरण : ३६ हजार ३०० : ३६ हजार ३०० : १००**
**रोहा : ४२ हजार ६७० : ३७ हजार १९१ : ८७.१६**
**माणगाव : ४२ हजार १०४ : ३९ हजार ८१० : ९४.५५**
**श्रीवर्धन : २१ हजार ३८३ : १९ हजार ८३८ : ९२.७७**

## ११३ गावांचा होणार कायापालट

सुविधा उपलब्ध करून देणे, प्रत्येक आदिवासी वाड्या-पाड्यापर्यंत वीज सुविधा उपलब्ध करून देणे, जेथे जेथे शक्य आहे, तेथे सौर विद्युत ऊर्जेद्वारे वीजपुरवठा उपलब्ध करून देणे, प्रत्येक वाडीतील प्रत्येक घरात गॅस जोडणी उपलब्ध करून देणे तसेच अंगणवाडी केंद्र उभारून याद्वारे पोषण अभियान राबविणे या व यासारख्या अनेक सुविधांचा सामावेश करण्यात आला आहे.

आदिवासी भागातील पर्यटन क्षमतेचा लाभ घेण्यासाठी आणि आदिवासी समुदायाला पर्यायी उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी, पर्यटन मंत्रालयाच्या माध्यमातून ट्रायबल होम स्टे (आदिवासी कुटुंबाबरोबर राहणे) यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. तसेच, वनक्षेत्रात राहणाऱ्या पट्टाधारकांकडे मिशन अंतर्गत विशेष लक्ष पुरविले जाईल. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील शासकीय आणि वसतिगृहांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच सिकलसेल आजाराच्या निदानासाठी अत्याधुनिक सुविधा असलेले क्षमता केंद्र स्थापन करण्यात येईल.

या अभियानांतर्गत आदिवासी उत्पादनांच्या प्रभावी विपणनासाठी आणि विपणन पायाभूत सुविधा, जागरूकता, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि वाहतूक सुविधा सुधारण्यासाठी आदिवासी बांधवांकडून थेट खरेदी करता यावी यासाठी टीएमएमसी केंद्रांची स्थापना केली जाईल.

हे अभियान जिल्ह्यातील असुरक्षित समुदायाच्या कल्याणासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचणारी सहकारी संघराज्य व्यवस्था आणि संपूर्ण सरकार या दृष्टीकोनाचे आगळे वेगळे उदाहरण ठरेल, असे जावळे यांनी स्पष्ट केले.

## विमान लँडिंगचा मुहूर्त ठरला!


नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ रायगड जिल्ह्यात उलवा आणि पनवेलदरम्यान १,६०० हेक्टर जमिनीवर तयार होत आहे. त्यासाठी सिडको नोडेल एजन्सी म्हणून काम करत आहे. १९ हजार ६०० कोटी रुपये खर्च करुन हे विमानतळ उभारण्यात येत आहे. हा ग्रीनफील्ड एअरपोर्ट प्रॉजेक्ट ५ टप्प्यात पूर्ण होणार आहे. सिडकोचे निर्देशक विजय सिंघल आणि संयुक्त प्रबंध निदेशक शांतनु गोयल या ठिकाणी सुरु असलेल्या कामांवर लक्ष ठेवत आहेत.

नवी मुंबई विमानतळावर विविध कनेक्टिव्हिटी असणार आहे. मेट्रोसह बुलेट ट्रेनची कनेक्टिव्हिटी या ठिकाणी असणार आहे. एक्स्प्रेस वे, उपनगरीय रेल्वे, जलमार्गाची कनेक्टिव्हिटी असणार आहे. त्याचा फायदा ठाणे, कल्याण, पुणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्राला होणार आहे. हे विमानतळ एक माईल्डस्टोन असणार आहे. या विमानतळामुळे मुंबई विमानतळावरील भारही कमी होणार आहे.

# माथेरानमध्ये पसरली धुक्याची चादर

## अनेक दिवसांनी पावसाचे आगमन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



गेली काही दिवस पावसाने विश्रांती घेतली आहे आणि त्यामुळे वातावरणात उकाडा वाढला होता. आज दुपार पासून माथेरान गावाला धुक्याने वेधले होते आणि सायंकाळ पासून विजांचा कडकडाट सोबतीला ढग यांचा गडगडाट याच्यासोबत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्याचवेळी आज सायंकाळ नंतर कर्जत तालुक्याच्या विविध भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला असून वातावरणातील उकाडा देखील कमी होण्यास मदत झाली आहे.

पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे गेली दोन दिवस वातावरणात प्रचंड उष्मा वाढला होता.त्यात हवामान वेधशाळेने दिलेल्या सूचनेनुसार आज दुपार पासून पावसाचे वातावरण निर्माण झाले होते. माथेरान मध्ये तर धुक्याची दुलई यामुळे गावात शुकशुकाट दिसून येत होता.सर्वत्र चुकल्याने अंधार केला होता आणि त्यामुळे शहरात रस्ते ओस पडल्याचे चित्र होते.त्यात सायंकाळी पावसाचे आगमन झाले आणि पावसाने अक्षरशः झोडपून काढण्यास सुरुवात केल्यावर माथेरान स्तंभ झाले होते. स्थानिक पुन्हा एकदा पाऊस अनुभवत होते.

कर्जत तालुक्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावली होती आणि त्यात पावसाच्या मदतीला ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट यामुळे घराबाहेर असलेल्यांची मोठी त्रेधातिरपीट उडाल्याचे दिसून आले. पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकरी प्रचन्ड संकटात सापडला होता. त्या बळीराजाला आज पासून आगमन झालेल्या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. त्यामुळे भाताची शेते कोरडी पडली होती आणि काही ठिकाणी तर भाताची रोपे सुकून देखील गेल्याचे दिसून येत आहेत. पण आज पासून सुआगमन केलेला पाऊस आणखी २० दिवस तरी बरसात राहिला पाहिजे अशी अपेक्षा शेतकरी वर्गाची आहे.

## कर्जत स्थानकात सरकता जिना तयार

**नेरळ** : मध्य रेल्वेवरील कर्जत रेल्वे स्थानकात फलाट एक वर मुंबई दिशेकडे सरकता जिना उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. कर्जत स्थानकातील हा दुसरा सरकता जिना आहे. यापूर्वीच फलाट दोनवर सरकता जिना कार्यान्वित झाला असून, कर्जत स्थानकात एकूण तीन सरकते जिने असल्याची माहिती मिळत आहे. मध्य रेल्वेचे मेन लाईन वरील कर्जत स्थानक हे मुंबई पुणे मार्गावरील मध्यवर्ती आणि महत्वाचे स्थानक आहे. या दिवसरात्र प्रवाशांचे वर्दळ सुरु असते आणि त्यामुळे प्रवाशांचे सोयीसाठी विकासाचे अनेक विकास प्रकल्प राबविले जात आहेत. त्यात कर्जत स्थानकात नवीन पादचारी पूल यांची निर्मिती झाली आहे. आता फलाट दोन पाठोपाठ फलाट एक वर देखील सरकता जिना उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| सौ. अश्विनी शशिकांत शिंदे<br>सौ. सुनिता जयवंत कदम | ३३/१० | ००-१०-१० | ०-६१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २५/०९/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रमोद हसुराम तांडेल, रा. घर नं. ९७०, खारघर गाव, ग्रीन फिंगर ग्लोबल शाळेसमोर, सेक्टर १३, खारघर, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे किरवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू. पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| २४/४ | ०.२१.००<br>पो.ख. ०.०२.५०<br>एकुण ०.२३.५० | १.२५ | श्री. विलास रामचंद्र जगदाळे, वगैरे |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा ) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २५/०९/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ‘पुष्प विमल’ निवास, नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.


(छायाचित्र : सुधीर नाझरे)

## मुरूड समुद्रकिनारी कचऱ्याचे साम्राज्य

मुरूड तालुक्यातील एकदरा पुलाजवळील कोळीवाडा समुद्रकिनारी कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. येथील स्थानिक लोक आणि व्यावसायिकांकडून थेट समुद्रात कचरा व सांडपाणी सोडण्यात येत आहे. यामुळे येथील भागात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे. एकिकडे राज्य सरकार स्वच्छता अभियान पंधरवडा राबवत असून मुरूड पालिकेचे स्वच्छता व कचरा नियोजनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मुरूडमधील ऐतिहासीक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक याच मार्गावरून ये-जा करत असतात. त्यांना देखील याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होण्याची दाट शक्यता असल्याचे येथील नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

### एमपी ९३ प्लॉटचा ताबा

# अद्यापही नगरपरिषदेला नाहीच

- १५ वर्षे प्रस्ताव लालफितीत
- माथेरान वाहतूक कोंडीचे ग्रहण कायम






**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान बद्दल प्रचंड आत्मीयता आणि प्रेम असल्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असते. परंतु, येथे आल्यावर दस्तुरी वाहन पार्किंगमध्ये सुट्ट्यांच्या हंगामात वाहने पार्किंग करण्यासाठी जागा उपलब्ध नसते. जागोजागी इमारतीचे सामान अस्तव्यस्त पडलेले असून कुठेतरी जंगलात किंमती वाहने पार्क करावी लागतात. याच ठिकाणी एमपी ९३ हा प्लॉट असून याचा ताबा अद्यापही नगरपरिषदेला मिळालेला नाही. यामुळेच पर्यटकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.

आगामी दिवाळी पर्यटन हंगाम जवळ आला असून नेहमीप्रमाणे माथेरान घाटात वाहतूक कोंडी होणार हे नवीन नाही. या कोंडीतून मार्ग काढताना पर्यटकांना आपल्या लवाजम्यासह माथेरान गाठणे म्हणजे एक प्रकारे येथे येण्याची शिक्षाच असते. वनखात्याच्या अंतर्गत असणाऱ्या वन समितीच्या माध्यमातून वाहन कर आकारणी केली जाते. तर, नगरपरिषदेकडून प्रवासी करासोबतच वाहन कर आकारणी सुद्धा केली जाते. दोन्ही खात्यांकडून दुबार वाहन कर आकारणी घेऊन सुद्धा येथे सुरक्षित पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. ही संपूर्ण जागा वनखात्याच्या अखत्यारीत येत असून वन समिती केवळ जागेचे भाडे आकारते. परंतु, वाहनांची कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेतली जात नाही. यामुळे बेभरवशाचा खेळ करत पर्यटकांना आपली किंमती वाहने पार्क करून गावात यावे लागते. तसेच, जर का वाहनांची देखभाल घेतली जात नसेल तर पार्किंग आकारणी घेऊ नये, असे पर्यटक बोलत आहेत.

> “मी २००७ साली नगराध्यक्ष असताना हा प्लॉट नगपरिषदेकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव केला. त्याला प्रतिसाद देत तत्कालीन जिल्हाधिकारी निपुण विनायक यांनी हा भुखंड खासगी ट्रस्टकडून सरकारजमा करून घेतला. यानंतर हा ५.५ एकरचा भुखंड नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्याकरीता प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला. दुर्दैवाने मागील १५ वर्ष हा प्रस्ताव शासकीय पुर्ततांच्या लालफितीत अडकुन पडला होता. मागील दिड वर्ष मी मंत्रालय, जिल्हाधिकारी कार्यालय, कोकण आयुक्त कार्यालय व नगरपरिषद यांचेबरोबर सातत्याने समन्वय साधत आहे. लवकरच राज्याचे मुख्यमंत्री हा प्लॉट नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव मंजुर करतील.”
>
> – मनोज खेडकर, माजी नगराध्यक्ष, माथेरान

> “माथेरान हे जगप्रसिध्द थंड हवेचे ठिकाण असताना पार्किंगसाठी जवळपास १६ वर्षांपासून ९३ एमपी प्लॉट नगरपालिका मागणी करीत आहे. राज्यसरकार पर्यटन वाढविण्यासाठी नवं नवीन पॉलिसी आणते. परंतु, माथेरानच्या पर्यटनासाठी आवश्यक प्लॉट राज्यसरकार कडून नगरपालिकेला हस्तांतरण होतं नाही, ही बाब गतिमान व्यवस्थेसाठी खेदजनक बाब आहे.”
>
> – शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते, माथेरान नगरपालिका

## श्रीवर्धन आगाराचा भोंगळ कारभार



- व्यवस्थापकांचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

सातत्याने नफ्यात असलेल्या श्रीवर्धन एसटी आगारातील अनेक गाड्या भंगार अवस्थेत असून काही गळक्या तर अनेक गाड्या खाडखुड वाजत आहेत. श्रीवर्धन आगारातून मुंबई सारख्या नगरीत जाण्यासाठी अशा भंगार अवस्थेत आसलेल्या गाड्या चालवून एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय अधिकारी आणि आगार व्यवस्थापक प्रवाशांच्या जीवाशी खेळ करीत आहेत.

श्रीवर्धन आगारातून प्रवासी वाहतूक करीत असलेल्या अनेक एसटी गाड्यांच्या टपावर प्लास्टिकचे आवरण टाकलेले आहे. तर, अनेक गाड्यांचे कॅरियर व खिडक्या निकामी झालेल्या आहेत. या गाड्या लांब पल्ल्याच्या मार्गावर धिम्या गतीने धावत असल्याने प्रवासी वर्गाचा पुरता खोळंबा होत आहे. याबाबत एसटी चालक व वाहक यांच्याकडे विचारणा केल्यावर गाडी जोरात पळविण्याचा प्रयत्न केला तर गाडी हेलकावे खाते. यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटण्याची शक्यत असल्याचे त्यांचे म्हणने आहे. असे असतानाही श्रीवर्धन एसटी आगार व्यवस्थापक प्रवाशांच्या जीवाशी खेळ का करित आहे, असा प्रश्न आ-वासून उभा आहे.

म्हसळा स्थानकातुन सोमवारी (दि.२३) सकाळी दहा वाजता सुटणारी श्रीवर्धन-दिघी तुरुंबाडी मार्गे मुंबईकडे जाणारी एसटी (एमएच-२०-बीएल-११६६) पुरती गळकी व भंगार अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. अशाच भंगार झालेल्या आणखी गळक्या गाड्या मुंबई फेरीसाठी वापरात आहेत. या गाडीमधुन वरिष्ठ अधिकारी आणि आगार व्यवस्थापक यांनी तिकीट काढून पाच ते सहा तास प्रवास करून बघावा आणि नंतरच जनतेच्या जीवाशी खेळ करावा, अशी रास्त अपेक्षा प्रवासी वर्गाने केली आहे.

## महिला सुरक्षितता विषयावर कार्यशाळा

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महिला सुरक्षिततेबाबत सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले कायदे व महिला सुरक्षितता/गुन्हे नोंद या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक के.ए. शामा यांनी केले. तसेच, मुलींची सुरक्षितता, अध्यात्मिक जीवनशैली इत्यादी विषयांवर भाष्य करून विद्यार्थिनींनी आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे त्यानी सांगितले.

कार्यक्रमातील प्रमुख मार्गदर्शक पराग म्हात्रे यांनी घरगुती छळ व घराबाहेरील छळ याला कसे टाळले पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. निकिता कासारे यांनी स्त्रीभ्रूण हत्या, हुंडा पद्धती, लैंगिक छळ, घरगुती अत्याचार, बेटी बचाव बेटी पढाव इत्यादी मुद्द्यांना स्पर्श करून विद्यार्थिनींनी सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण घेतले पाहिजे, असे सांगितले. संघश्री गायकवाड यांनी भारतीय न्याय संहिता, ऑनलाइन फीसिंग, सायबर क्राईम, माहिती तंत्रज्ञानातून घडलेले गुन्हे इत्यादी विषयावर सविस्तर भाष्य केले. तसेच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र यशवंत मिसाळ यांनी उपस्थित विद्यार्थिनींना महिला सुरक्षितता व गुन्हे नोंद या विषयावर मार्गदर्शन केले.

## अनंत लोखंडे यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील चिल्हे येथील उत्कृष्ठ माजी कबड्डीपटू अनंत लोखंडे यांचे वयाच्या ६२व्या वर्षी निधन झाले. रोहा तालुक्यासह सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रिडा तसेच विविध क्षेत्रातील समाज बांधव त्यांच्या अंतीम विधीत सहभागी झाले होते. यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, पुतणे, सूना, भावजय असा मोठा परिवार आहे. अनंत लोखंडे यांचे दशक्रिया विधी रविवारी (दि.२९) तर उत्तर कार्य मंगळवार १ ऑक्टोबर रोजी चिल्हे येथील त्यांच्या राहत्या घरी संपन्न होणार आहे.

## सात फुटी अजगराला जीवदान

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**



सुधागड तालुक्यातील तांबडमाळ येथे एक सात फुट लांब अजगर आला होता. या अजगराने कोंबड्याची शिकार करून त्याला फस्त केले व यानंतर तो तेथे असलेल्या लाकडाच्या सरपणात शिरला होता. या अजगराला पालीतील सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी सर्पमित्र चांद शेख यांच्या मदतीने पकडून वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप जंगलात सोडले आहे.

दरम्यान, अजगराला पाहून तांबडमाळ येथील वाडीतील ग्रामस्थ प्रचंड घाबरले होते. मात्र, सर्पमित्र घटनास्थळी येताच त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. तसेच, वाडीवर अजगर आल्याची माहिती वनविभाग कर्मचारी मारोती मुंडे यांनी फोन करुन सर्पमित्रांना दिली होती. या सात फुट लांब अजगराला सुरक्षित अधिवासात सोडण्यासाठी सर्पमित्र मारोती मुंडे यांच्या सोबत वनविभागाचे कर्मचारी व राजेश रुईकर हे होते. यावेळी अजगराला पकडत असताना पाहण्यासाठी वाडीतील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

## बळीराजा सुखावला

**। कोलाड । वार्ताहर ।**

गेल्या पंधरा दिवसापासून पाऊस गायब झाला होता. यामुळे भातशेती करपु लागल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, कोलाड परिसरात सोमवारी (दि.२३) संध्याकाळपासून पावसाला जोरदार सुरुवात झाली. यामुळे भातशेतीला नवसंजीवनी मिळाली असून शेतकरी राजा सुखावला आहे. तसेच, यावर्षी चांगला पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याकडून देण्यात आला होता. हा अंदाज खरा ठरला असून जुन महिन्याच्या सुरुवातीला पहिल्याच आठवड्यापासून चांगली सुरुवात झाली. यामुळे भात पेरणीची कामे देखील वेळेवर सुरु झाली. जुलै महिन्यात पावसाने अती जोरदार सुरुवात केल्यामुळे या महिन्याच्या सुरुवातीला भात लावणीची सुरुवात झाली होती.

## बेलदार समाजाचे बेमुदत उपोषण

**। महाड । प्रतिनिधी ।**




महाड तालुक्यातील आमशेत ग्रामपंचायत हद्दीतील राहते घर तोडल्याप्रकरणी बेलदार समाजाच्या नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर भर पावसात आमरण उपोषण चालू केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अशोक हरिभाऊ पवार हे बेलदार व भटक्या समाजाचे असून महाड तालुक्यातील अमशेत गावात त्यांनी घर बांधलेले होते. हे घर बेकायदेशीर असल्याचे ठरवून ग्रामपंचायत व जागा मालकाने पोलीस व प्रशासनाला हाताशी धरून त्यांचे राहते घर तोडल्याचा आरोप अशोक हरिभाऊ पवार यांनी केला आहे. महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी अशोक हरिभाऊ पवार व त्यांच्या कुटुंबियांना अटक करण्याची याबाबत धमकी दिल्याचा आरोप पवार यांनी केला आहे.

तसेच, जीवन माने यांची तातडीने बदली करावी व राहते घर तोडल्या प्रकरणी एसआयटी मार्फत चौकशी करावी, अशी मागणी अशोक पवार व त्यांच्या कुटुंबीयांनी केली असून महाड मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर त्यांनी सकाळपासून आमरण उपोषण चालू केले आहे. याबाबत त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रायगड जिल्हाधिकारी, महाडचे प्रांताधिकारी व तहसीलदार यांना याबाबतचे निवेदन सादर केले आहे.

## आक्रोश मोर्चाचे आयोजन

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि शिक्षकांच्या मागण्यांची शासनाने सोडवणूक करावी. याकरिता राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांनी बुधवारी (दि.२५) जिल्हाधिकारी कार्यालयावर



आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. शाळा आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी हे आंदोलन असून आम्हाला सर्व पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन सुधागड तालुक्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### निवारा शेड बनला मद्यपींचा अड्डा

# वेणगाव स्मशानभूमीची दुरवस्था

- परिसरात दुर्गंधी व कचऱ्याचे साम्राज्य
- ग्रामपंचायतीचे अद्याप दुर्लक्ष





**। वेणगाव । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात वेणगाव येथील स्मशान भूमीतील निवारा शेड दारुड्यांचा अड्डा बनला आहे. ही स्मशान भूमी गावाबाहेरच्या मुख्य रस्त्यालगत एकांतात असल्यामुळे तसेच ग्रामपंचायतीचे कोणत्याही प्रकारची देखरेख नसल्यामुळे येथील निवारा शेडचा काहीजण येथे बसून दारू पिण्यासाठी वापर करतात. दारू पिल्ल्यानंतर दारू व पाण्याच्या बाटल्या, ग्लास, खाऊची रिकामी पाकिटे हे सर्व तिथेच टाकून जातात. यामुळे निवारा शेडमध्ये कचरा व दुर्गंधी पसरल्याने निवराशेडची दुरवस्था झालेली आहे.

वेणगाव ग्रामपंचायतीचे स्मशान भूमी परिसरात दुर्लक्ष असून येथील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच, स्मशानासाठी लागणारी लाकडे साठवून ठेवण्यासाठी साठवण खोली आहे. पण त्या खोलीत लाकडेच नसतात. गावात एखादे मयत झाले तर बाहेरून लाकडे मागावी लागतात. तसेच, या खोलीला व निवारा शेडच्या दरवाजांना कुलूप नाही. यातच ग्रामपंचायतीची देखरेख नसल्याने, तसेच इतर दिवशी कोणी इकडे फिरकत नसल्याने दारू पिणाऱ्या लोकांना मोकळीक मिळत आहे. अशातच चांगल्या निवारा शेडची दुरवस्था देखील झालेली आहे. स्मशान भूमीच्या वरचे पत्रे उडाले असल्याने येथे पावसात खुप मोठी गैरसोय होते. अशा एक ना अनेक समस्यांची गैरसोय पाहायला मिळत आहेत. तरी ग्रामपंचायतीने लक्ष घालून उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यात यावे, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

## दुर्गम भागात आरोग्य तपासणी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**




दुर्गम आणि डोंगराळ भागात राहत असलेले ग्रामस्थ आजारी पडल्यास आजही शेकडो मिटर पायी चालत जावे लागते. मात्र, त्यांची शरिरिक प्रकृती उत्तम रहावी यासाठी एटीजी हेल्थ केअर सामाजिक संस्था पुढाकार घेत असून त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे साकुचीवाडी या गावामध्ये जाऊन ही आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांना लागणारी औषधे मोफत देण्यात आली. या उपक्रमाला बिलियन हार्ट बिट्टींग यांचे सहकार्य लाभत आहे.

तालुक्याच्या ठिकाणी आजही गंभीर परस्थिती असून अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय करताना घरातील गृहस्थांची तारांबळ उडत आहे. याचबरोबर दिवसेंदिव विविध आजार डोके वर काढत असताना घरचे भागविणे कठिण जात आहे. यासाठी एटीजी हेल्थ केअर सामाजिक संस्था पुढाकार घेत असून सातत्याने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहे. यावेळी या परिसरातील लहानांपासून ते वयोवृद्ध यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे डॉ. विश्वासराव गिरी आणि अश्विनी गिरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी परेश, राठोड, लक्ष्मण सिद, रोहित पाटील अदि उपस्थित होते.

# एक मेला, शंभर सुटले

अक्षय शिंदे आरोपी होता. त्याच्याविरुध्दचे आरोप गंभीर होते. परिस्थितीचा पुरावा त्याच्याविरुध्द होता. त्याला आमच्यासमोर आणा आणि मारुन टाका असे बदलापुरातील आंदोलक तेव्हाच म्हणत होते. ते घडणे अर्थातच शक्य नव्हते. त्याला एक महिना लोटला. सोमवारी पोलिसांनी त्याला गोळी घालून ठार केले. लोकांची मागणी पूर्ण झाली. अक्षय दोषी होता हे न्यायालयात सिध्द करण्याचे राहून गेले. पण लोकांना त्याची गरज वाटत नाही. अक्षय मेला अशी बातमी येताच बदलापुरात लोकांनी पेढे वाटले. फटाके उडवले. जणू शत्रुराष्ट्रावर विजय मिळवला असा आनंद साजरा केला. आरोपी मरणे हे लोकांसाठी आवश्यक होते. ते पोलिसांनी झटपट करून दाखवले. त्यामुळे लोकांसाठी ते हिरो ठरले आहेत. हेच पोलिस मुळात तक्रार दाखल करून घ्यायला तयार नव्हते. गुन्हा घडला बारा ऑगस्टला. पण तक्रार दाखल झाली सोळा तारखेला. तेव्हाच आरोपीला अटक झाली. तरीही चार दिवस तपास पुढे सरकत नव्हता. म्हणूनच तर वीस ऑगस्टला लोकांनी रेल रोको आंदोलन करावे लागले. तेव्हा कुठे सरकारला जाग आली. तपासाची चक्रे हलली. जेमतेम तीन-चार वर्षांच्या मुलींवर अत्याचाराचे प्रकरण होते. मुलींचे पालक तक्रार करायला पुढे आले हीच मोठी बाब होती. अनेकदा आपल्याच मुलीची बदनामी होईल अशी भीती वाटते. पोलिस, न्यायालये यांची पायरी चढू नये अशीच मानसिकता असते. या मुलींच्या पालकांनी मात्र धाडस दाखवले. पण पोलिसांनी त्यांना तास न तास बसवून ठेवले. असा प्रकार होऊच शकत नाही असे सांगितले. मुलींवर अविश्वास दाखवला. शाळेच्या चालकांशी व मुख्याध्यापकांशी बोलल्याचे नाटक केले. प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. अखेर तक्रार दाखल झाल्यावरही मुलींच्या वैद्यकीय तपासणीत टाळाटाळ केली. पण खुद्द लोकच आता हे सर्व विसरले आहेत. पोलिसांवरचा त्यांचा राग गेला आहे. न्यायालयांवर पूर्वीही त्यांचा विश्वास नव्हताच. आता फटाके वगैरे वाजवून त्यांनी हा अविश्वास नव्याने प्रकट केला आहे.

### त्या उद्दाम अधिकाऱ्यांचे काय?

मूळ तक्रार घेण्यात टाळाटाळ करणारी एक महिला अधिकारी होती. ती पालकांशी अत्यंत मग्रुरीने वागली. दुसरे एखादे पालक असते तर त्यांनी घाबरून पाठपुरावाच सोडून दिला असता. पण हे पालक ठाम राहिले. त्यांना राजकीय मदतही मिळाली. पण त्या अत्यंत उद्दाम पोलिस बाईचे व तिच्या सहकाऱ्यांचे काय झाले? आतापर्यंत त्यांच्या केवळ बदल्या झाल्या. कदाचित त्यांची एखादी पदोन्नती रोखली जाईल. पण त्यांच्याविरुध्दही फौजदारी गुन्हे दाखल व्हायला हवेत. त्यांनाही शिक्षा व्हायला हवी. पण अक्षय मारला गेल्याच्या आनंदात लोक हे विसरून गेले आहेत. त्या उद्दाम पोलिसांच्या वागणुकीबद्दल गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजतागायत खेद व्यक्त केलेला नाही. विरोधकांना खोट्यानाट्या गुन्ह्यात अडकवणे, भीमा-कोरेगाव किंवा अनिल देशमुख वा नबाब मलिकसारखी प्रकरणे निर्माण करणे हे तत्परतेने घडते. त्याचा बेंबीच्या देठापासून राजकीय प्रचार करण्यात देवेंद्र आघाडीवर असतात. मग बदलापुरातील बेफिकिरीची जबाबदारीही त्यांनीच घ्यायला हवी. बलात्काराच्या घटनेमध्ये तक्रारदाराला टोलवणे हा बलात्काराइतकाच गंभीर गुन्हा मानला जायला हवा. पण अक्षयला मारून पोलिसांनी या सगळ्या प्रश्नांमधून आपली व फडणवीसांची सुटका केली आहे. बदलापूर ठाणे जिल्ह्यात असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हे प्रकरण राजकीयदृष्ट्या अडचणीचे ठरत होते. आता मुख्य आरोपीच खलास झाल्याने तेही पैसे आले का असे विचारत राज्यभर फिरायला मोकळे झाले आहेत. एक मेला आणि हे बाकीचे शंभर सुटले अशी ही स्थिती आहे. पोलिसांच्या तावडीत असताना मुळात अक्षयचे हात बांधलेले का नव्हते, पोलिसांकडचे पिस्तुल त्याने मिळवले कसे आणि त्याचे लॉक काढून गोळी झाडली कशी असे प्रश्न इतर सर्वांना पडतात. पण शिंदे आणि फडणवीसांना ते पडत नाहीत. विरोधकांनी हे प्रश्न विचारले तर ते त्यांची सरळ उत्तरे देत नाहीत. नाहीतरी तुम्हाला फाशी हवी होती असे म्हणून ते प्रश्नांना बगल देतात.

### हा खरा न्याय नव्हे

दरम्यान, बदलापूरच्या ज्या शाळेत हा प्रकार घडला तेथील संस्थाचालक व इतर आरोपींना अजूनही अटक झालेली नाही. ते फरार आहेत असे सांगतात. फडणवीसांच्या कार्यक्षम पोलिसांना हे पांढरपेशे लोक पकडता येत नसतील तर फडणवीसांनी राजीनामाच द्यायला हवा. ही शाळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहे व शाळाचालक कोणी आपटे नावाचा इसम आहे. तो गायब आहे. नेमके घटना घडल्यावेळचे सीसीटीव्ही फुटेजही गायब आहे. गुन्ह्याची वर्दी देण्याची प्राथमिक जबाबदारी वर्गशिक्षिका आणि मुख्याध्यापिका यांची होती. त्यांचे पुढे काय झाले हे कळलेले नाही. आता बहुदा हे प्रकरण बासनात गुंडाळले जाईल. खटला पुढे चालवला जाईल. पण त्याला काही अर्थ नसेल. सरकारला तर हेच हवे आहे. पण तसे होण्याला सामान्य जनताही जबाबदार आहे. न्यायालयांची प्रक्रिया ही दीर्घ काळ चालते. अनेकदा आरोपी निर्दोष सुटतात. पण या सर्वांना देखील बऱ्याचदा पोलिसच जबाबदार असतात. ते मुळातच केस कच्ची ठेवतात. सतत तारखा मागत राहतात. तपास नीट करत नाहीत. याबाबत जनतेने खरे तर राग व्यक्त करायला हवा. पण पोलिसांनी चकमकीत कोणाला ठार केले की तिला न्याय झाला असे वाटते. पण एका अक्षयला मारून पोलिस आणि त्यांचे मायबाप असलेले शिंदे-फडणवीस सरकार पुढचे शंभर गुन्हे पचवायला मोकळे होत असतात. न्यायालयीन यंत्रणेत अनेक दोष आहेत. पण ती अजूनही बऱ्याच अंशी निःपक्ष आहे. पोलिसांना आणि सरकारला चाप लावण्याची शक्ती तिच्यातच आहे. तिच्यावर विश्वास ठेवण्यातच जनतेचे हित आहे. पोलिस हे कितीही झाले तरी ते सरकारचे नोकर असतात. ते खोट्या चकमकीत खऱ्या किंवा खोट्या गुन्हेगारांना मारू शकतात, हे पूर्वी अनेकदा दिसले आहे. असल्या पोलिसांनी केलेला न्याय हा खरा न्याय होऊ शकत नाही.

विचार

# आघाड्यांच्या राजकारणाचा चाणक्य

***डाव्यांच्या चळवळीत सहभागी होऊन देशपातळीवर नेतृत्व करणारे आणि शेतकरी, आदिवासी, भूमिहीन, तरुण, कामगार यांच्या हक्कांसाठी लढणारे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांच्या निधनाने दुर्बलांचा आवाज शांत झाला. ज्योती बसू, बुद्धदेव भट्टाचार्य यांच्यानंतर डाव्या चळवळीचे निर्विवाद आधारस्तंभ म्हणून ते उदयास आले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एका युगाचा अंत झाला आहे.***



**भागा वरखडे**

एक कुशाग्र बुद्धीचा तरुण..देशात बारावीत पहिला आलेला...विद्यापीठातही चमकलेला... आणीबाणीनंतर डाव्यांच्या चळवळीत सहभागी होऊन देशपातळीवर नेतृत्व केलेला आणि भारतातील शेतकरी, आदिवासी, भूमिहीन, तरुण, कामगार यांच्या हक्कांसाठी लढणारा अशी ओळख असलेला नेता म्हणून सीताराम येचुरी यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने दुर्बळांचा आवाज शांत झाला. येचुरी हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीआय-एम) सरचिटणीस होते. ज्योती बसू आणि बुद्धदेव भट्टाचार्य यांसारख्या डाव्या व्यक्तींनंतर येचुरी हे भारतीय डाव्या चळवळीचे निर्विवाद आधारस्तंभ म्हणून उदयास आले. येचुरी हे प्रभावी आणि उत्कृष्ट वक्ते म्हणून संसदेत ओळखले जात होते, तसेच एक हुशार आणि तल्लख तर्कशास्त्रकार म्हणून सर्व पक्षांच्या नेत्यांनी त्यांचा आदर केला होता. घटनात्मक आणि राजकीय बाबींवर त्यांची पकड असल्याने ते सत्ताधारी पक्षासाठी आव्हानात्मक विरोधक बनले. सरकारच्या उत्तरदायित्वाबाबत स्पष्टता, विश्वास आणि लोकशाहीप्रती असलेली सखोल जबाबदारी यामुळे त्यांनी संसदेत सत्ताधारी पक्षाला कायम विचार करायला भाग पाडले. आपल्या आयुष्यात त्यांनी डाव्या चळवळीला नवे आयाम दिले आणि भारतीय राजकारणात आपली खास ओळख निर्माण केली. येचुरी यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एका युगाचा अंत झाला आहे ज्याने समाजवाद, समता आणि सामाजिक न्यायासाठी अनेक दशके काम केले. तेलुगू ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या सीताराम यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात आल्यानंतर राजकीय प्रवासाला सुरुवात केली. त्यांचे वडील सर्वेश्वर सोमयाजुला येचुरी एक अभियंता आणि आई कल्पकम येचुरी सरकारी अधिकारी होत्या. येचुरी यांनी 'सीबीएसई बोर्डा'च्या बारावीच्या परीक्षेत नवी दिल्ली येथील प्रेसिडेंट इस्टेट स्कूलमधून देशात प्रथम क्रमांक मिळवला आणि सेंट स्टीफन कॉलेज, दिल्ली येथून अर्थशास्त्रात बी.ए. (ऑनर्स.) पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी 'जेएनयू'मधून अर्थशास्त्रात एम.ए. केले. तिथून त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. १९७० च्या आणीबाणीच्या काळात येचुरी 'जेएनयू'मध्ये विद्यार्थी नेता म्हणून उदयास आले. ते 'एसएफआय' या विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष झाले. पश्चिम बंगाल आणि केरळ वगळून अन्य राज्यातला पहिला नेता होण्याचा मान त्यांना मिळाला.

१९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली. येचुरी यांची राजकीय कारकीर्द या कठीण काळात आकाराला आली. त्यामुळे त्यांना सार्वजनिक चिंता आणि डाव्या राजकारणाची सखोल माहिती मिळाली. २०१५ मध्ये ते माकपचे सरचिटणीस बनले. तिथून त्यांनी पक्षाच्या आत आणि बाहेर अनेक आव्हानात्मक परिस्थितींचा सामना केला. येचुरी यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची विचारधारा टिकवून जनसंवाद वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नेहमीच डाव्या विचारसरणीला चिकटून राहून, समाजवाद, समता आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर सातत्याने भर दिला. कामगार, शेतकरी, आदिवासी आणि समाजातील वंचित घटकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आवाज उठवला. येचुरी यांनी भारतीय राजकारणात लोकशाही मूल्यांना सर्वोच्च मानले आणि आणीबाणीच्या काळापासून आयुष्यभर या मूल्यांसाठी लढा दिला. संसदेच्या आत आणि बाहेर लोकशाही प्रक्रियेच्या रक्षणासाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला.

येचुरी यांनी केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही डाव्या चळवळीला नवी उंची दिली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवर भारतीय डाव्यांचे प्रतिनिधित्व केले आणि जागतिक स्तरावर समाजवादाचा पुरस्कार केला. भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी शक्तींना बळकट करण्यासाठी येचुरी यांनी अनेक प्रसंगी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांसोबत व्यापक युती करण्याच्या धोरणावर जोर दिला आहे. भारतीय डाव्या राजकारणात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असली, तरी त्यांच्या नेतृत्वात पक्षाला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. येचुरी यांच्या नेतृत्वाच्या काळात सीपीआय(एम) चा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. विशेषतः पश्चिम बंगाल आणि त्रिपुरासारख्या राज्यांत तर सत्ताही गेली. येचुरींच्या सर्व प्रयत्नांनंतरही पक्ष आपल्या बालेकिल्ल्यातही कमजोर होत गेला. ते पक्षाचे पुनरुज्जीवन करू शकले नसल्याची टीका त्यांच्यावर झाली. सीपीआय(एम) मधील दोन गटांमध्ये नेहमीच संघर्ष होता. एक पुरोगामी गट जो काँग्रेस आणि इतर पक्षांशी युती करण्यास अनुकूल होता आणि कट्टर डावा गट जो तत्त्वांशी तडजोड करण्याच्या विरोधात होता. ही दुफळी संपवण्यात येचुरी यशस्वी झाले नाहीत. त्यांनी काँग्रेससोबत व्यापक विरोधी आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न केला;परंतु ही रणनीती पश्चिम बंगालमध्ये यशस्वी झाली नाही. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि सीपीआय (एम) यांची युती सपशेल अपयशी ठरली आणि त्यांच्या राजकीय कुशाग्रतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यांना राष्ट्रीय स्तरावर पक्षाचा विस्तार करण्यात यश आले नाही. पक्षाचा प्रभाव प्रामुख्याने काही राज्यांपुरता मर्यादित राहिला आणि राष्ट्रीय स्तरावर तो कमकुवत झाला. डाव्या विचारसरणीविषयी तरुणांची आवड कमी झाली आणि पक्षाचे नेतृत्व वाढत्या वयाच्या नेतृत्वापुरते मर्यादित राहिले. त्यांना भारतीय राजकारणात डाव्या चळवळी कायम ठेवण्यासाठी सतत संघर्ष करावा लागला आणि काही वेळा त्यांना धोरणात्मक फेरबदल करावा लागला. येचुरी यांच्या नेतृत्वाखालील सर्वात मोठे आव्हान भारतीय राजकारणातील डाव्या पक्षांची कमी होत चाललेली ताकद वाचवणे हे होते. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या राज्यांमध्ये, जिथे एकेकाळी डाव्या आघाडीचे वर्चस्व होते, त्यांचा प्रभाव कमी झाला. पश्चिम बंगालमध्ये २०११ मध्ये ३४ वर्षांच्या शासनानंतर पडलेले डावे सरकार या आव्हानाचे सर्वात मोठे उदाहरण होते.

भारतीय राजकारणात, आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणाच्या वाढत्या प्रभावाने डाव्या विचारसरणीसमोर नवीन आव्हान उभे केले आहे. येचुरी यांना मार्क्सवादी तत्त्वे आणि आर्थिक वास्तविकता यांचा समतोल साधावा लागला. त्यांना अनेकदा विचारधारा आणि रणनीतीवरून सीपीआय(एम) मध्ये मतभेदांचा सामना करावा लागला. पक्षाचा एक पुराणमतवादी दृष्टिकोन ठेवण्यास अनुकूल होता, तर येचुरीसारखे नेते काँग्रेससारख्या इतर पक्षांशी युती करण्याचा सल्ला देत होते. भारतातील झपाट्याने बदलणाऱ्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत तरुणांना डाव्या विचारसरणीकडे आकर्षित करणे येचुरी यांच्यासाठी मोठे आव्हान होते. वाढती बेरोजगारी, शिक्षणातील घसरण, राजकीय उदासीनता असे मुद्दे असूनही नव्या पिढीला आकर्षित करण्यात त्यांना यश आले नाही. जातीयवाद आणि धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्यावर सातत्याने लढा देत असताना, येचुरी यांना एकीकडे भाजपची वाढती सत्ता आणि दुसरीकडे अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षा आणि हक्कांचे संरक्षण या आव्हानाचा सामना करावा लागला. विरोधी पक्षात असताना येचुरी आणि डाव्या पक्षांना संसदेत बहुमत असलेल्या सरकारसमोर त्यांची धोरणे आणि विचारसरणी प्रभावीपणे मांडता न आल्याने अनेकदा आव्हान वाटले. आर्थिक धोरणे असोत, शेतकऱ्यांचे प्रश्न असोत किंवा परराष्ट्र व्यवहार असोत; विरोधी पक्षात राहिल्याने त्यांना प्रभावी निर्णय घेण्यात अडचणी येत होत्या. भारत आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या आर्थिक आणि धोरणात्मक संबंधांनी डाव्या पक्षांसमोर आव्हान उभे केले आहे. येचुरी यांनी नेहमीच भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. येचुरींचे राजकारण आणि त्यांच्या योगदानाचे त्यांचे समर्थक आणि टीकाकार दोघेही कौतुक करतात. समानता, न्याय आणि लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचे प्रतीक त्यांचे जीवन होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व त्यांनी अशा वेळी केले, जेव्हा भारतीय राजकारणातील या पक्षाचा दबदबा कमी झाला होता.

येचुरी आणीबाणीतील तुरुंगवास भोगून परत आल्यावर देशात लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी भूमिगत झाले. त्यांच्या आयुष्यातील हा सर्वात महत्त्वाचा 'टर्निंग पॉइंट' होता. या वेळीच त्यांची राजकीय सक्रियता आणि साम्यवादी विचारसरणीची बांधिलकी वाढली. 'जेएनयू'मधून पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी येथून अर्थशास्त्रात पीएच.डी करण्यासाठी प्रवेश घेतला; परंतु १९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली. त्यामुळे त्यांची पीएच. डी. अर्धवट राहिली आणि त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अधुरे राहिले. संसदेच्या वरिष्ठ सभागृहात आपल्या बोलण्याच्या क्षमतेने आणि वास्तवदर्शी भाषण शैलीने विरोधकांनाही त्यांचा मुद्दा पटत असे. २००५ मध्ये ते प्रथमच पश्चिम बंगालमधून राज्यसभेचे सदस्य झाले. ते १८ ऑगस्ट २०१७ पर्यंत राज्यसभेवर राहिले. या काळात त्यांनी लोकहिताचे अनेक मुद्दे संसदेत मांडले. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात जुलै २००८ मध्ये भारत आणि अमेरिका यांच्यात नागरी अणु करार झाला, त्या काळात येचुरी चर्चेत होते. सिंग या कराराबाबत 'सीपीएम'च्या अनेक अटी मान्य करायला तयार होते; परंतु करात हे मान्य करायला तयार नव्हते. ८ जुलै २००८ रोजी करात यांनी सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली. येचुरी हे राजकारणी तसेच सामाजिक कार्यकर्ते, अर्थतज्ज्ञ, पत्रकार आणि लेखक होते. काँग्रेस नेते पी. चिदंबरम्? यांच्यासोबत त्यांनी १९९६ मध्ये संयुक्त आघाडी सरकारसाठी समान किमान कार्यक्रम तयार केला. ते बराच काळ वृत्तपत्रांमध्ये स्तंभलेखन करत होते. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यात लेफ्ट हँड ड्राइव्ह, व्हॉट इज हे हिंदु राष्ट्र, पॉलिटिक्स ऑफ हेट (हिंदीमध्ये), २१व्या शतकातील समाजवाद या पुस्तकांचा समावेश आहे. त्यांनी डायरी ऑफ फ्रीडम मूव्हमेंट, द ग्रेट रिव्हॉल्टः अ लेफ्ट अप्रायझल आणि ग्लोबल इकॉनॉमिक क्रायसिस - अ मार्क्सिस्ट पर्सपेक्टिव्ह या ग्रंथांचे संपादनही केले. येचुरी यांनी १९७७ मध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर इंदिरा गांधींनी संस्थेच्या कुलपतिपदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने केली. इंदिरा गांधी स्वतः येचुरी यांचे म्हणणे ऐकायला आल्या होत्या. त्यांनी त्यानंतर कुलपतिपदाचा राजीनामा दिला. येचुरी यांचे महत्त्व डाव्यांना फार कळले नाही.

आजकाल

# पेजरचे स्फोट आणि तंत्रज्ञानाचा धोका

**सूरज सामंत**

काही दिवसांपूर्वी इस्राएल ने हेजबोल्ला च्या नेटवर्क (भारत हेजबोल्ला ला अतिरेकी संघटना समजते का ?) ला उध्वस्त करण्यासाठी एक नवीन तंत्र वापरले. शक्यता आहे की या घटनेचे जगावर दूरगामी परिणाम होतील.

मोबाईल फोन च्या वापरामुळे माणसाचे लोकेशन समजणे सोपे जाते म्हणून अनेक अतिरेकी संघटना पेजर चा वापर करतात.

पेजर चा वापर मोबाईलच्या बेभरवशामुळे इमर्जन्सी सर्व्हिस मध्ये कार्यरत शासकीय विभागम संघटना व संस्था देखील करतात. पेजरचा ठावठिकाणा लागणे कठीण असते आणि नेटवर्कची अडचण देखल मर्यादित असते.

हेजबोल्ला च्या लोकांकडे असलेले हजारो पेजर्स एकाच वेळी मेसेज आल्यानंतर डेटोनेट झाले. मेसेज पाठवल्यानंतर काही सेकंदात ब्लास्ट होईल अशी व्यवस्था केली होती. जेणेकरून मेसेज वाचताना चेहऱ्याजवळ स्फोट होईल.

पण पेजर्स पर्यंत पोचले कसे? तर काही पेजर्स बनवणाऱ्या कंपन्या विकत घेतल्या आणि त्यांच्याकडे बनवण्याच्या ऑर्डर्स आल्यानंतर बॅटरीमध्ये स्फोटक व डेटोनेटर बसवले.

यासाठी बरीच वर्ष काम करावे लागले असणार. हा स्फोट थोड्या कालावधीनंतर व्हायचा होता म्हणतात पण काही पेजर्स दुरुस्तीला गेले असताना काहीतरी संशयास्पद आढळल्याने पूर्ण तपास होण्याआधीच घाईघाईत स्फोट करावे लागले.

काही मृत्यू झाले, काही जखमी झाले, काही सिव्हिलियन्स / नागरिक देखील मारले गेले.

हेजबोल्ला ने बदला म्हणून रॉकेट्सचा मारा केला आहे आणि मध्य पूर्व आशियात ही आग पसरू शकते अशी शंका आहे.

हे घटनेबाबत, पण आपला मुद्दा थोडा वेगळा आहे.

१. आज जे तंत्रज्ञान इस्राएल कडे आहे ते पुढे अतिरेक्याकडे पोचणार नाही याची खात्री नाही. विमाने हायजॅक करण्याची गरज राहील का? विमान प्रवासात मोबाईल, लॅपटॉप बॅन करतील का ? असे प्रश्न विचारले जात आहेत.

२. सर्वसाधारणपणे युद्धामध्ये देखील काही संकेत असतात. काही गोष्टी वर्ज्य असतात. इस्राएलने त्याला कधीच किंमत दिलेली नाही. पण आता हे प्रकार सगळीकडे पसरतील का? सामान्य नागरिकांच्या जीवाची कोणीच पर्वा करणार नाही का?

३. मध्यंतरी कॅलिफोर्निया मध्ये रस्त्यावरचे सगळे काढून टाकण्याची ऑर्डर आली कारण ते चिनी बनावटीचे होते व त्यामार्फत केले जाण्याची शंका वाटली. परंतु भारतात तर जवळपास सगळ्याच गोष्टी चिनी बनावटीच्या आहेत. भारतात स्पायिंग चीन साठी किती कठीण असेल?

४. चिनी वस्तू व चीन सोबत संबंध असणारे व्यावसायिक यांचा वापर करत, ब्लॅकमेलिंग करत किंवा धमकी देत चीन त्यांना वाट्टेल ते करून घेऊ शकेल का? सीमा विस्तार करत असताना इतर देशांना गप्प बसण्यास भाग पाडू शकेल का? त्या देशातील उच्चपदी असणाऱ्या लोकांचे सिक्रेट्स चीन किंवा इस्राएल कडे असतील का ? व त्याबदल्यात त्यांच्या फायद्याची कामे करून घेतली जात असतील का?

५. अदानीने इस्राएल सोबत जॉईंट व्हेंचर करत भारतात संरक्षण क्षेत्रात उद्योग उभारणी केली. याचा इस्राएल स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणार नाही याची गॅरेंटी आहे ?

६. तंत्रज्ञानात आघाडीवर असणाऱ्या देशांकडे ताकद एकवटली जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तंत्रज्ञानात प्रगती कशामुळे होते तर शिक्षण, उच्च शिक्षण वगैरेमुळे. भारत दिवसेंदिवस शिक्षणामध्ये गुंतवणूक कमी करत आहे, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण याचा दर्जा घसरला आहे, चीन भारताच्या जवळपास २८ पट मध्ये गुंतवणूक करतो. पण भारतामध्ये सध्या भर ज्योतिष, बाबाबुवा, गोबर वगैरे सारख्या थोतांडावर आहे. युनिव्हर्सिटी मध्ये मोदीपूजा करतात, मोदीवर निबंध लिहायला लावतात.... या स्पर्धेत भारत तगू शकेल?

७. भारताने शिक्षणामध्ये गुंतवणूक न करता बाबा बुवा गिरी करावे, धर्मरक्षण करावे, आपापसात भांडावे यासाठी जगातील शक्ती जाणूनबुजून प्रयत्न करत असतील का? करत असतील तर त्यांच्या या प्रयत्नात भारतातील त्यांचे हस्तक कोण आहेत?

अनेक प्रश्न आहेत.

लोकसंसद

## निश्चयाचे कौतुक

अंतराळात अडकलेल्या सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे आता अमेरिकेच्या निवडणुकीत अंतराळातून मतदान करणार आहेत. अमेरिकेच्या सार्वत्रिक निवडणुका लवकरच होणार आहेत. त्याच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नाला सुनीता विल्यम्स यांनी आम्ही नासाच्या सहाय्याने अंतराळस्थानकावरूनच मतदानाचा हक्क बजावणार आहोत असे वक्तव्य केले आहे. पृथ्वीवर परतण्याच्या शक्यते बाबत बोलतांना बुच विल्मोर यांनी अधिक वेळ मिळाला असता तर, कदाचित आम्ही स्टारलायनर सोबत येऊ शकलो असतो असे व्यक्तव्य केले. तसेच आपल्याला न घेता बोईंग स्टारलायनर पृथ्वीवर परत जात आहे हे बघून दुःख होत आहे. असे, सुनीता विल्यम्स यांचे वक्तव्य जरी असले तरी, अमेरिकेच्या होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत अंतराळातून मतदान करण्याची इच्छा मात्र दृढ आहे.या करीता नासा सर्वोतोपरी सहकार्य आणि यंत्रणा सज्ज करण्याचे काम करीत आहे. ही मतदान प्रक्रियेतील महत्वाची आणि ऐतिहासिक घटना असेल. असे नासा कडून सांगण्यात आले आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्या हजारो मैल दूर अंतरावरून केलेल्या निश्चयाचे कौतुक वाटणे स्वाभाविक आहे.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ सप्टेंबर**

**१८५१:-** इतिहास संशोधक काशीनाथ नारायण साने यांचा जन्म. विष्णूशास्त्री चिपळूणकर आणि ज. वा. मोडक यांच्या सहकार्याने त्यांनी 'काव्येतिहाससंग्रह' नावाचे मासिक काढले. या मासिकातून त्यांनी 'भाऊसाहेबांची बखर', 'पेशव्यांची बखर', 'सभासद बखर', 'पानिपतची बखर' अशा छोट्या मोठ्या २५ बखरी संपादन करुन त्या प्रसिध्द केल्या. याच बखरी त्यांनी पुढे पुस्तकरुपात प्रसिध्द केल्या. याखेरीज त्यांनी अस्सल मराठी ५०१ ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन केले आणि ती कागदपत्रेही पुस्तकरुपाने अभ्यासकांपुढे आणली. एकंदरीत इतिहासाचार्य राजवाडयांपूर्वी मराठी इतिहास संशोधनात त्यांनी आपला ठसा उमटवला होता. **१८९१ :-** विनोदी लेखक, कथाकार कॅप्टन गोपाळ गंगाधर लिमये यांचा जन्म. 'विनोदसागर', 'गोपाळकाला' हे विनोदी कथासंग्रह प्रसिध्द आपल्या सैन्यकाळातील आठवणींविषयी 'सैन्यातल्या आठवणी' हे पुस्तकही विनोदी शैलीत लिहिले. 'मेकॅनो' ही त्यांची कथा गाजली. **१९१५:-** मराठी बखरवाङ्मयाचे अभ्यासक, लेखक, इतिहासकार रघुनाथ विनायक हेरवाडकर यांचा 'मराठी बखर' हा त्यांचा पी.एच.डी चा प्रबंध पुस्तकरुपात प्रसिध्द. 'संभाजीराजे', 'राजाराम महाराज', 'शाहूमहाराज आदींची चरित्रे त्यांनी लिहिली. **१९२६:-** 'दुरितांचे तिमिर जावो', 'वेगळं व्हायचं मला', 'वाहतो ही दुर्वाची जुडी', 'सीमेवरुन परत जा' अशी वेगवेगळया विषयांवरील गाजलेली नाटके लिहिणारे बाळ कोल्हटकर यांचा जन्म. मराठी रंगभूमीवरील गाजलेली १८ नाटके लिहिणारे बाळ कोल्हटकर स्वतः अभिनेते व निर्माते होते. त्यांच्या नाटकांचे आतापर्यंत ५००० हून अधिक प्रयोग झालेले आहेत. मराठी रंगभूमीसाठी त्यांनी दिलेले योगदान फार मोठे आहे. वयाच्या १४व्या वर्षी 'जोहार' हे नाटक राजपूत स्त्रियांच्या पतीच्या पराभवानंतर करण्यात येणाऱ्या जोहारावर आधारित नाटक लिहिले. रेल्वेत नोकरी करताना त्यांनी 'चाणक्य' हे नाटक लिहिले. 'घर कुणाचं?' हे रंगभूमीवर आलेले त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर त्यांनी 'मुंबईची माणसं', 'एखाद्याचं नशिब व मला निवडून द्या' ही नाटके रंगभूमीवर आणली. यातील 'मुंबईची माणसं व एखाद्याचं नशिब' ही नाटके यशस्वी ठरली. 'दुरितांचे तिमिर जावो' हे त्यांचे आणखी एक गाजलेले नाटक. याशिवाय 'वाहतो ही दुर्वाची जुडी', 'वाऱ्यात मिसळले पाणी', 'लहानपण देगा देवा' अशी नाटके त्यांनी लिहिली आणि त्यात अभिनयसुध्दा केला. **१९२७ :-** लेखक, कथा-कादंबरीकार कृष्णाजी केशव गोखले यांचे निधन. 'हिंदू स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' ह्या लेखमालेसह भाषांतर : रुपांतर की स्वतंत्र? आणि मराठी भाषेतील काही दोष व मीमांसा' हे लेख त्यांचे गाजले. गायनकलेविषयीचे गैरसमज दूर करणारी 'तिलोत्तमा' व एकत्र कुटूंब पध्दतीचे दोष दाखविणारी 'एकत्र की विभक्त' या त्यांच्या कादंबऱ्यांनी वाचकांचे लक्ष वेधले. याशिवाय काही अनुवादीत कादंबऱ्या त्यांच्या नावावर आढळतात. तथापि, मराठी साहित्यात त्यांना नावलौकिक आहे तो नामवंत कथालेखक म्हणून. 'खूप केली सूनबाई व इतर गोष्टी' हा त्यांचा कथासंग्रह. सहज सुंदर मर्मविनोदात्मक सुबोध भाषा आणि कथानकाचा उलगडा रहस्यावर अवलंबून असल्याने ती कथा मनोरंजनात्मक करण्याची कला गोखल्यांनी अचूक साधली. **१९२८ :-** ख्यातनाम पत्रकार, लेखक, प्रभावी वक्ते माधव यशवंत गडकरी यांचा जन्म. त्यांची 'लोकसत्ते'तील कारकीर्द लक्षणीय ठरली. त्यांचा 'असा हा महाराष्ट्र', 'असा हा गोमंतक' यासह वृत्तपत्रांतील स्तंभांची दृष्टिक्षेप, चौफेर ही पुस्तके प्रकाशित 'भ्रष्टाचार्य अंतुले', 'साहित्यातील हिरे आणि मोती', 'अष्टपैलू अत्रे आदी त्यांची पुस्तकेही खूप गाजली. **१९३५ :-** मराठी ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळाचे संस्थापक, लेखक, कवी भास्कर कृष्ण उजगरे यांचे निधन. 'मराठी ख्रिस्ती वाङ् मयाचा इतिहास' हा त्यांचा छोटेखानी ग्रंथ म्हणजे ख्रिस्ती कला गोखल्यांनी अचूक साधली. **१९३६ : -** लेखक पेशाने वकील व्ही के पटेल यांचा जन्म. ह्यांनी ''अपघातात मृत्यू' किंवा 'जखमी झाल्यास नुकसान भरपाई कशी मिळवावी' या संबंधीचा ग्रंथ लिहिला. **१९३८ :-** लेखक प्रा. डॉ ज्ञानराज काशिनाथ गायकवाड यांचा जन्म. 'गीतगूजन' हा काव्यसंग्रह आणि नवरंग, रंगधारा हे कथासंग्रहाचे सहसंपादन त्यांनी केले.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ सप्टेंबर

१) श्रीम. विद्या नंदकुमार कुवळेकर
रामनाथ, अलिबाग, २५-९-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


**आजचे अन्नदाते**



**कै. दत्तात्रय कृष्णाजी पराडकर, स्मृतिदिन, अलिबाग**

# ग्रा.पं.मध्ये नल-जल मित्रांची होणार नियुक्ती

- **रायगड जिल्हा परिषदेचा उपक्रम**
- **ग्रामीण भागात रोजगार मिळणार**



**। रायगड । वार्ताहर ।**

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी, प्लंबर, मेकॅनिक, फिटर व इलेक्ट्रिशियन, पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नल-जल मित्र यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी आपापल्या ग्राम पंचायतीशी संपर्क साधवा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

याबाबत जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य रीतीने व्हावी. या उद्देशाने प्रति ग्रामपंचायत ३ नलजल मित्र यांची निवड करण्यात येणार आहे. तिन्ही पदांकरीता प्रत्येक पदासाठी तीन याप्रमाणे प्रति ग्रामपंचायत ९ उमेदवारांची नामनिर्देशने राज्यस्तरावर करण्यासाठी ग्रामपंचायतने त्यांची माहिती घेऊन ॲपवर भरायची आहे. ग्रामपंचायतीने सादर केलेल्या नामनिर्देशनामधून राज्यस्तरावरून उमेदवारांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे, असे डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले.

प्लंबर-गवंडी, मोटर मेकनिक-फिटर आणि इलेक्ट्रिशियन-पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी गावातील अनुभव असलेल्या व उचित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. म्हणजेच हे कौशल्य असलेल्या उमेदवारास गावातच रोजगार उपलब्ध होणार आहे. यामधून प्रति ग्रामपंचायत कौशल्य संचसाठी एक ट्रेडसाठी एक उमेदवार प्रमाणे अंतिम ९ पैकी ३ उमेदवारांची निवड करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक जल जीवन मिशन शुभांगी नाखले यांनी केले आहे.

## लांजा-साटवली मार्गावर झाडे बनली धोकादायक

**लांजा :** तालुक्यातील लांजा-साटवली मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडी-झुडपांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. मार्गाच्या दुतर्फा वाढलेली झाडी तोडून मार्ग साफ करावा, अशी मागणी वाहन चालकांमधून केली जाते आहे.

तालुक्याच्या पश्चिम भागाला जोडणारा मुख्य मार्ग म्हणून लांजा-साटवली मार्गाकडे पाहिले जाते. सध्या या रस्त्याची नव्याने दुरुस्ती करण्यात आली आहे, असे असले तरी रस्ता झाडी-झुडपांच्या गर्तेत अडकला आहे. त्यामुळे रस्त्याची साईडपट्टी गायब झाली आहे. त्यामुळे समोरुन एखादे वाहन आल्यास वाहन थेट रस्त्याच्या खाली उतरवावे लागते. त्यामुळे अपघात होणयाची शक्यता आहे. काही दुचाकींचा किरकोळ अपघात झाला आहे. या मार्गावरील मोठ्या प्रमाणात अनावश्यक वाढलेली झाडे लवकरात लवकर तोडून मार्ग मोकळा करावा, अशी मागणी वाहन चालकांमधून होत आहे.

# राज्यातील वीज कर्मचारी आजपासून संपावर जाणार

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

राज्यातील वीज कर्मचारी, अभियंते २५ व २६ सप्टेंबर रोजी संपावर जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी अभियंते अधिकारी कृती समितीच्यावतीने १९ सप्टेंबरपासून राज्यभर द्वारसभा, निदर्शने करीत असून आता २५ पासून संप करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिकार क्षेत्रातील कंपन्यातील १ लाख कर्मचारी, अभियंते या ४८ तासांच्या संपात सहभागी होणार आहेत. यामध्ये जिल्ह्यातील सुमारे १३०० कर्मचारी सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी व अभियंत्यांच्या कृती समितीने सहा प्रमुख मागण्यांकरीता २५ पासून ४८ तासाच्या संपावर जात असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच पोलिस अधीक्षक यांना आज दिले. शासनाचे उर्जामंत्री, उर्जामंत्रालय, मुख्य सचीव व तिन्ही कंपन्यांच्या अध्यक्षांना १० सप्टेंबरला निवेदन देऊन मागण्यांकडे लक्ष वेधले आहे. त्यामध्ये त्यांनी राज्यातील तीन कोटीहून अधिक वीज ग्राहकांना जीवाची जोखीम पत्करून अखंडित वीज निर्मिती व वितरणाचे काम वीज कर्मचारी व अभियंते महाराष्ट्रात करीत आहेत.

सीमेवर अतिरेक्यांशी लढताना ज्या संख्येने जवान सैनिक निधन पावतात, त्यापेक्षा जास्त कर्मचारी दरवर्षी महाराष्ट्राच्या वीज उद्योगात मरण पावतात, असे सांगून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

### वीज कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या

**सर्व वीज कर्मचारी-अभियंते व अधिकाऱ्यांना पेन्शन योजना लागू करा, राज्यातील १६ जलविद्युत केंद्राच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करा, २०० कोटीवरील प्रकल्प टेंडर काढून खाजगी उद्योजकांना देण्याचा निर्णय रद्द करा, प्रिपेड-स्मार्ट मिटर योजनेद्वारे महावितरणचे खाजगीकरण बंद करा, कंत्राटी कामगारांना टप्याटप्याने कायम करावे, समान काम-समान वेतन लागू करा, अशा प्रमुख मागण्या आहेत.**

## कातळे ग्रामपंचायतीतर्फे बीच स्वच्छता अभियान

**गुहागर :** स्वच्छ भारत मिशनअंतर्गत तवसाळ येथील काशिवंडे बीच स्वच्छ करण्यात आला. या अभियानामध्ये ग्रामपंचायत कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या पंधरवड्यामध्ये शाळा स्तरावर घोषवाक्य व चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच अंगणवाडी सेविका, आशा सेविका बचत गट प्रतिनिधी यांच्यामार्फत गृहभेटी घेऊन स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे आवाहन सरपंच प्रियांका सुर्वे यांनी केले. परिसर नेहमीच स्वच्छ ठेवण्याते त्यांनी आवाहन केले आहे.

यावेळी नम्रता निवाते, ग्रामविकास अधिकारी निमकर, कर्मचारी अमोल सुर्वे, दीपक बारस्कर, प्रशिक्षणार्थी मंगेश झगडे, मुख्याध्यापक प्रमोद साळवी, दिलीप गुरसुळे, अंकुर मोहिते, संदीप खंडगावकर, दीपक चव्हाण आदी उपस्थित होते.

# दडी मारलेल्या पावसाचे कोकणात पुनरागमन

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने मराठवाड्यात दोन दिवसांपासून पुनरागमन केले असून सोमवारीही ठिकठिकाणी मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. या पावसामुळे सोयाबीन काढणीत शेतकऱ्यांना व्यत्यय येत आहे. छत्रपती संभाजीनगरात गेल्या काही दिवसांपासून उकाडा वाढला आहे. सायंकाळी चारच्या सुमारास काही भागात तुरळक पाऊस झाला. जालना शहरात दुपारनंतर पावसाने जोरदार हजेरी लावली होती. अर्धा तास पडलेल्या या मुसळधार पावसामुळे रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. बीड जिल्ह्यात सोमवारी दुपारपासून जिल्ह्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावली होती.

गेल्या २४ तासांत २८.४ मिमी पावसाची नोंद झाली. पावसामुळे शेतामध्ये सोयाबीन काढणाऱ्या शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. शेतामध्ये पाणी साचून इतर पिकांचे नुकसान होत आहे. हिंगोलीसह जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी सोमवारी पाऊस झाला. गेल्या २४ तासांत २.८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

खेड, सावर्डेसह रत्नागिरी तालुक्यात जोरदार पाऊस पडला. किनारपट्टी परिसरात वेगवान वारेही वाहत होते. या पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले. या पावसाचा फटका भातशेतीला बसला असून अनेक ठिकाणी उभी रोपे आडवी झाली आहेत. कापणी योग्य भात रोपांसाठी हा पाऊस त्रासदायक ठरु शकतो.

सिंधुदुर्गात पुन्हा पावसाने झोड उठवली. दरम्यान, मुसळधार पावसामुळे सायंकाळी भुईबावडा घाटात तीन ते चार ठिकाणी दरड कोसळली. त्यामुळे शेकडो वाहने घाटरस्त्यात अडकून पडली होती. नंतर वाहतुक सुरु झाली.

# राष्ट्रीय ‘पोषण माह’ राबविण्यात देशात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

- **आयुक्त कैलास पगारे यांची माहिती**

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला व बालकांच्या आहारासंदर्भात असलेले गैरसमज दूर व्हावे, महिलांनी बालकांच्या पोषणासाठी काय काळजी घेतली पाहिजे. या सबंधिची माहिती जनसामान्यपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागामार्फत ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत विविध उपक्रम राबवून ‘‘पोषण माह’’ साजरा करण्यात येत आहे. राज्यात आतापर्यंत अंगणवाडयांमार्फत १ कोटी ६८ लाख १५ हजार १९५ उपक्रम राबवण्यात आले. हा ‘‘७ वा राष्ट्रीय पोषण माह’’ राबविण्यात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक असल्याची माहिती एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्त(अंगणवाडी) कैलास पगारे यांनी दिली.

रायगड भवन येथील महिला व बाल विकास विभागाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

केंद्र शासनाच्या ‘सुपोषित भारत’ संकल्पनेनुसार एक महत्वपूर्ण कार्यक्रम म्हणून राष्ट्रीय पातळीवर पोषण अभियान कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत महिला व बालकांचे आरोग्य व पोषण या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व ‘सुपोषित भारत’ ही संकल्पना साकारण्याच्या दुष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील एकूण ५५३ बालविकास प्रकल्पातील १ लाख १० हजार ५१६ अंगणवाडी केंद्रांमध्ये करण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील २९ लाख ३६ हजार ९२४ बालके, ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील २४ लाख ६२ हजार ६९० बालके तर ४ लाख ९४ हजार ०७४ गरोदर महिला आणि ४ लाख ९६ हजार ८५२ स्तनदा माता तसेच गडचिरोली, नंदूरबार, धाराशीव आणि वाशिम या चार आकांक्षित जिल्हयातील १ लाख १२ हजार ३९५ किशोरवयीन मुली या योजनेचा लाभ घेत आहेत.

महिला व बाल विकास विभागाच्या केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ‘‘७ वा राष्ट्रीय पोषण माह’’ या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. माहे सप्टेंबर २०२४ मध्ये संपूर्ण राज्यभर साजरा होत असलेल्या ‘‘७ वा राष्ट्रीय पोषण माह’’ मध्ये केंद्र शासनाने ॲनेमिया, ग्रोथ मॉनेटरींग, वरचा आहार, पोषण भी पढाई भी, उत्तम प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा वापर या पाच संकल्पना निश्चित करुन दिल्या आहेत.

राज्यात ‘एक पेड माँ के नाम’ अभियान, ‘चिमुकल्यांची वसुंधरा’ अभियान, ‘ॲनेमिया’, ‘बाळाचे पाहिले हजार दिवस’, ‘बाळांचे वृध्दी सनियंत्रण’, ‘डायरिया प्रतिबंध’ आणि ‘पोषण भी पढाई भी’ अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. याची नोंद जनआंदोलन डॅशबोर्डवर घेण्यात आली आहे.

# रामदास कदमांसमोर आव्हान उभे ठाकले

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**



शिवसेना नेते रामदास कदम यांनी थेट भाजपवरच हल्लाबोल केला आहे. त्यामुळे भाजपने दापोली खेड मंडणगड विधानसभा मतदारसंघावर दावा करत विद्यमान आमदार योगेश कदम यांच्यासमोर आव्हान उभं केलं आहे. तर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख माजी आमदार संजय कदम यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यांनीही जोरदार तयारी सुरू केली आहे. तर मनसेकडून वैभव खेडेकर यांच्या नावाचीही चर्चा आहे. त्यामुळे योगेश कदम यांना निवडून आणण्याचे आव्हान रामदास कदम यांच्या समोर असणार आहे.

शिवसेनेत पडलेली फुट, भाजपला थेट रामदास कदम यांनी दिलेले आव्हान, संजय कदम यांची वाढत जात असलेली ताकद, नुकत्याच लोकसभा निवडणुकीत आघाडीला मिळालेले मताधिक्य हे सर्व पाहता कदम यांच्यासमोर निवडून येण्याचे मोठे आव्हान असणार आहे. दापोली-खेड-मंडणगड विधानसभा मतदारसंघ हा पूर्वीपासून शिवसेनेचा बालेकिल्ला राहीला आहे. शिवसेनेचे सूर्यकांत दळवी या मतदारसंघातून तब्बल पाच वेळा निवडून आले होते. पण २०१४ मध्ये युती तुटली. त्यात रामदास कदम आणि सूर्यकांत दळवी यांच्यातील वादाचा फटका शिवसेनेला बसला. त्यात निवडणुकीत सूर्यकांत दळवी हे पराभूत झाले. या लढाईत शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेल्या संजय कदम यांनी बाजी मारत शिवसेनेचा हा बालेकिल्ला काबीज केला होता.

त्यानंतर २०१६ पासून राम दास कदम यांचे चिरंजीव योगेश कदम यांनी मतदारसंघातील वाडी-वस्त्या पिंजून कढण्याचं काम सुरू केलं. याच जोरावर २०१९ मध्ये त्यांनी शिवसेना पक्षाकडून तिकीट मिळवलं. सूर्यकांत दळवी या जेष्ठ नेत्याची उमेदवारी कापत शिवसेनेनं योगेश कदम यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकली. या निवडणूकीतही संजय कदम विरूद्ध योगेश कदम यांच्यात लढत झाली. त्यावेळी योगेश कदम यांना ९५ हजार ३६४ मतं मिळाली. तर राष्ट्रवादीचे तत्कालीन आमदार संजय कदम यांना ८१ हजार ७८६ मतं मिळाली. योगेश कदम हे दहा हजारा पेक्षा जास्त मतांनी विजय झाला होता.

या सर्व वादामुळे योगेश कदम यांच्यासमोर यावेळी आव्हान उभं ठाकलं आहे. त्यांची काय रणनिती असणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

# चिरनेरचा रणसंग्राम



**१९**३० मध्ये चिरनेर हे गाव पनवेल तालुक्यात व उरण पेट्यात होते. पनवेल काँग्रेस कमिटीने २५ सप्टेंबरचा जंगल सत्याग्रह फक्त चिरनेर येथे घेण्याचे ठरविले होते. त्या अगोदर ८ व १८ सप्टेंबरचे सत्याग्रह चिरनेर प्रमाणे इतर ठिकाणी झाले होते. मात्र २५ सप्टेंबरचा सत्याग्रह जरा वेगळ्या स्वरूपाचा आक्रमक होता. कुऱ्हाडी, कोयते घेऊन सरकारी मालकीच्या जंगलात सागवानी झाडावर घाव घालायचे आणि तेही सरकारी बंदुकीसमोर हे धाडसच होते. प्रत्यक्ष सत्याग्रह करणारे जंगलात घुसून झाडे तोडायला सुरुवात झाल्यावर, पूर्वेच्या टेकडीवर पोलीस निरीक्षक रामचंद्र दौलत पाटील यांनी सत्याग्रहींना बेड्या ठोकल्या. यावेळी अक्कादेवी जवळ चाफ्याच्या झाडाखाली बसलेल्या मामलेदार केशव जोशी यांना वरील वृत्तांत नाना खरे यांनी सांगितला. तेव्हा त्यांनी पोलीस निरीक्षकाला बेड्या काढावयास सांगितल्या. पोलीस निरीक्षकाला ही कृती अपमानकारक वाटली. मामलेदारांना सत्याग्रहींबद्दल सहानभूती होती. तर पोलीस निरीक्षक सूड भावनेने पेटले होते. मामलेदार पाणी पिण्यासाठी विहिरीचे बाजूला गेले. त्यावेळी जनतेने पोलिसांवर दांडके फेकली. कोणीतरी फायर असे म्हटले आणि गोळीबार सुरू झाला. बंदुकीचे आवाज ऐकून मामलेदार धावतच येऊन, ऑर्डर कोणी दिली. असे विचारत असतानाच, त्यांच्या मागे असलेल्या पोलीस निरीक्षकांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. ते खाली कोसळले. विमल गुप्ते या मुलीने त्यांचे डोके मांडीवर घेतले. त्यांना पाणी पाजण्याचा प्रयत्न केला. मात्र ते गतप्राण झाले. वडाच्या बाजूला फॉरेस्ट गार्ड काशिनाथ शेवडे यांच्या डोक्याला गोळी लागून त्यांचाही मृत्यू झाला. या स्वैर गोळीबारात जनतेपैकी धाकू गवत्या फोफेरकर (चिरनेर), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), परशुराम रामा पाटील (पाणदिवे), आनंदा माया पाटील (धाकटीजुई), रामा बामा कोळी (मोठीजुई), रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोप्रोली), हसुराम बुधाजी घरत (खोपटे), नाग्या महादू कातकरी (चिरनेर) हे धारातीर्थ पडले. बंदुकीतील गोळ्या संपल्यावर गावाकडे परतणाऱ्या शिपायांपैकी हरी तवटे, जयराम सावंत, नारायण कदम या तिघांना जनतेने ठार केले. चिरनेर गोळीबार प्रकरणात एकूण १३ लोकांनी आपले आयुष्य संपविले. चिरनेर जंगल सत्याग्रहाचा या पहिल्या स्मृतिदिनाचा एका खाजगी जागेत सभामंडप उभारला होता. पुष्यमाला व लता पल्लवांनी सुशोभित केलेल्या होत्या. या मंडपात हुतात्म्यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक माती व वाळूची पिंडी तयार करण्यात आली होती. चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या या पहिल्या हुतात्मा स्मृतीदिनाला डॉ. खरे, आमदार नाना पाटील, महाले व त्यांच्या पत्नी, नानासाहेब कुंटे, भाईसाहेब गुप्ते, नानासाहेब बेडेकर, विनायकराव गोविलकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली अक्कादेवीच्या माळरानावर साजरा करण्यात आलेला हा पहिला हुतात्मा स्मृतिदिन होय.

**दत्तात्रेय म्हात्रे**

# राजकीय पदाधिकाऱ्यांला दिला चोप

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याला युवतीसोबत ऑफिसमध्ये वेगळ्या अवस्थेत पकडल्यानंतर जमावाने या पदाधिकाऱ्याला बेदम मारहाण केली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड शहरातील कार्यालयात हा पदाधिकारी एका महिलेसोबत होता. भर दिवसा कार्यालयाचे दरवाजे बंद करून हा पीडित महिलेसोबत आत होता. गेल्या काही दिवसांपासून या पदाधिकाऱ्याच्या वागणुकीवर स्थानिकांना संशय होता. हा पदाधिकारी नेहमी प्रमाणे कार्यालयात आला होता. पीडित महिला ही याच कार्यालयामध्ये कामाला होती. दुपारच्या वेळी परिसरात वर्दळ कमी झाल्याचे लक्षात आल्यावर त्याने कार्यालयाचे शटर बंद केले. महिलेचे निकटवर्तीय कार्यालयावर पोहोचले आणि शटर उघडून आत गेले. तेव्हा दोघेही नको त्या अवस्थेत आढळून आले. त्यामुळे संतापलेल्या जमावाने या पदाधिकाऱ्याला चांगलाच चोप दिला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जमावाच्या तावडीतून या पदाधिकाऱ्याला ताब्यात घेतले. कार्यालयापासूनहाकेच्या अंतरावरच पोलिस स्टेशन आहे. पोलिस या पदाधिकाऱ्याला पोलिस स्टेशनला घेऊन जात होते, तेव्हा पुन्हा एकदा संतप्त जमावाने या पदाधिकाऱ्यावर हल्ला केला. भर रस्त्यावर जमावाने त्याला बेदम मारहाण केली.

# हेल्पलाईन नंबरचा गैरवापर, पोलिसांची दमछाक

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी पोलिसांनी हेल्पलाईन सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा महिलांनाही होत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. या हेल्पलाईनवर मदतीसाठी फोन आल्यानंतर पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचतात. शिवाय महिलांची सुरक्षित सोडवणूकही करतात.

कुडाळ पोलिसांना एक फोन आला होता. एका मुलीवर कुडाळ जवळ महामार्गावर अत्याचार सुरू आहेत. तिला मदतीची गरज आहे, असे फोनवरून सांगण्यात आले. त्यानंतर फोन ठेवण्यात आला. तातडीने सांगितलेल्या ठिकाणी पोलिस पोहोचले. पण तिथे असला काही प्रकार सुरू नव्हता. त्यामुळे पोलिसही चक्रावून गेले. हे कोणी आणि का केले असावे, असा प्रश्न पोलिसांना पडला. त्याचा शोध पोलिसांनी घेतला. गुन्हे रोखले जावे यासाठी हा हेल्पलाईन नंबर आहे. पण त्याचा गैरवापर होत असल्याचे आढळून आले. मुंबई गोवा महामार्गावरील एका हॉटेल जवळ विनम्र मोरे आणि नंदिता मोरे हे दोघे मुंबईला जाण्यासाठी उभे होते. त्यांच्या गाडीला येण्यासाठी उशिर होणार होता. त्यामुळे फावल्या वेळात काही तरी मज्जा करूया असं त्यांना सुचलं. त्यातून त्यांनी हे कृत्य केल्याचे समोर आले. पोलीसांनी दोघांना ताब्यात घेतले.

## १५ व्या शतकात तयार झाल्याचा पुरावा

# ४९९ वर्षांपूर्वीचा भला मोठा डोंगर

**। रत्नागिरी । वार्ताहर ।**

जगामध्ये सात आश्चर्य आहेत. त्यामध्ये नवनवीन शोध लागत आहेत, तशी नवी माहिती समोर येत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील केळशी येथील वाळूचा डोंगर सध्या पर्यटकांमुळे चर्चेचा विषय आहे. वाळूचा डोंगर हा मोठा आहे. १५ व्या शतकात आलेल्या प्रलयकारी त्सुनामीमुळे हा वाळूचा महाकाय डोंगर तयार झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील दोपीलीत हा वाळूचा डोंगर आहे.

दापोली हे कोकणातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. वाळूचा डोंगर म्हणजे निसर्गाचा अद्भूत चमत्कार. कोकणातील केळशीचा समुद्र किनारा वाळुच्या डोंगरासाठी प्रसिध्द आहे. कोकणात अथवा महारष्ट्रात कुठेही अशा प्रकारचा वाळुचा डोंगर पहायला मिळत नाही. केळशी गावच्या पश्चिमेस असलेला वाळूचा डोंगर म्हणजे निसर्गाचा अद्भूत चमत्कारच म्हणावा लागेल. दापोलीतील भारजा नदी आणि समुद्राचा जिथे संगम होतो. त्या संगमावरच हा वाळूचा महाकाय डोंगर आहे. हा डोंगर म्हणेज केळशी गावची सुरक्षा भिंतच आहे. समुद्राकडून म्हणजेच पश्चिमेकडून येणाऱ्या वादळापासून केळशी गावचे संरक्षण होते ते या वाळूच्या डोंगरामुळेच. हा वाळूचा डोंगर नामशेष झाल्यास केळशी गावाला भविष्यात मोठा धोका निर्माण होवू शकतो. अंदाजे पंधराव्या शतकात भारतात प्रलयकारी त्सुनामी आली होती. या त्सुनामीनंतर समुद्रात उठलेल्या वाळूच्या वादळाची वाळू या ठिकाणी बसली आणि येथे वाळूचा महाकाय डोंगर निर्माण झाला. सात वाळूच्या टेकड्यांवर केळशी गाव वसलेले आहे. सातत्याने सुमद्रात उठणारी वादळे, भरती-ओहटी यामुळे या वाळूंच्या डोंगराचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वाळूचा डोंगर नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. वाळूचा हा डोंगर अठरा मीटर उंच होता. आता याची झिज होवून तो फक्त आठ मीटर उंचीची राहिला आहे. त्सुनामीमुळे निर्माण झालेला वाळूचा डोंगर पर्यटकांचे आकर्षण बनला आहे. दापोलीत फिरायला येणारे पर्यटक केळशीला जाऊन हा वाळूचा डोंगर नक्की पाहतात. केळशी गाव पुण्यामुंबई पासून अंदाजे पाच तासांच्या अंतरावर आहे. डोंगराखाली मोठा खजिना दडला असल्याच्या अनेक कथा आहेत.



# पाच पुलांवरील टपरीधारकांना नोटीसा

## अतिक्रमण 'बांधकाम' शब्दामुळे बांधकाम विभागावर रोष

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर शहरातील महामार्ग अंडरपास बॉक्स कटींग स्वरूपाचा होऊन वाहतूक सुरू झाली आहे. परंतु, या महामार्गावरील पूर्व आणि पश्चिमेकडील सर्व्हिसरोड जोडणारे पाच पूल सध्या विविध टपरीधारक, वाहनमालक तसेच प्रवासी रिक्षा चालकांसाठी वाहनतळ ठरू पाहात आहेत. यापैकी टपरीधारकांना राष्ट्रीय महामार्ग बांधकाम उपविभागाच्या सहायक अभियंता महाडतर्फे नोटीसा जारी करण्यात येऊन अतिक्रमण बांधकाम न हटविल्यास कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. मात्र, यामध्ये 'अतिक्रमण बांधकाम' शब्दाच्या उल्लेखामुळे टपरीचालकांनी पोलादपूर शहरामध्ये महामार्गालगत कायम स्वरूपी बांधकाम करणाऱ्यांकडे अंगुलीनिर्देश केल्यामुळे बांधकाम उपविभागाला कारवाई करण्याऐवजी दोन्ही प्रकारच्या अतिक्रमण करणाऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार असल्याची चिन्हे दिसून येत आहेत.



● पोलादपूर शहरातील अंडरपास मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पूर्व आणि पश्चिम सर्व्हीसरोडला जोडणाऱ्या पाच पुलांवरील टपरीधारकांना महाड सार्वजनिक बांधकाम उपविभागतर्फे अतिक्रमण बांधकाम हटविण्याच्या नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग एस.टी. बसस्थानक परिसराच्या साधारणपणे ३० फूट जमिनीखालून गेल्यानंतर चौपदरीकरणाच्या काँक्रीट रस्त्याच्या महामार्गावरील भागात या महामार्गाचे पूर्व आणि पश्चिमेकडील सर्व्हिसरोड तयार करण्यात आले आहेत. अंडरपास महामार्गावर रस्ता दुभाजक म्हणून रस्त्याच्या मधोमध काही गार्डस्टोन बसविण्यात आले आहेत. मात्र, पूर्व आणि पश्चिमेकडील सर्व्हिस रोड यांना जोडण्यासाठी तब्बल पाच पूल बांधण्यात आले आहेत. सुरूवातीच्या नकाशामध्ये केवळ एकाच पुलासाठी मंजुरी आहे. मागणीनुसार महामार्ग बांधकाम उपविभागाने काळभैरवनाथ देवस्थानकडे जाणाऱ्या जोडरस्त्यासाठी पूर्वे कडून पश्चिमेकडील सर्व्हिसरोडकडे जोडणारा पूल न बांधल्याने रयत विद्यामंदिराकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तरेकडील बाजूच्या अंडरपास महामार्गावर पायपीट करून महामार्ग ओलांडावा लागत आहे. सध्याच्या पाच पुलांपैकी तीन पुलांवर टपऱ्या आणि खासगी वाहनांचा पागि झोन झाला असून, पोलादपूर एस.टी. स्थानकातून बाहेर येणाऱ्या तसेच स्थानकात जाणाऱ्या बसेसना अडथळा होत असल्याची तक्रार केली जात आहे. तर, दुसरीकडे पश्चिमेच्या सर्व्हिसरोडवरून पूर्वे कडे एसटी स्थानकामध्ये एसटी बसेस आणताना पश्चिमेच्या गटारवजा फुटपाथवर तसेच पुर्वे च्या रस्त्यावरून पश्चिमेच्या सर्व्हिसरोडवर बसेस नेताना बसेसची मागील बाजू पुर्वेच्या गटारवजा फुटपाथवर अडल्याच्या घटनांचे सातत्य दिसून येत आहे.

मूळ मंजूर नकाशा व आराखड्यानुसार पोलादपूरच्या अंडरपास बॉक्स कटींगपध्दतीच्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील बाजूला केवळ एकच व्हेईक्युलर ब्रिज मंजूर आहे. परंतु, तब्बल चार व्हेईक्युलर ब्रिज अधिक बांधताना ते बांधकाम अतिक्रमण आहे किंवा ती मंजुरी मागाहून देण्यात आली याबाबत कोणताही खुलासा राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम उपविभाग उपअभियंता महाडतर्फे स्पष्टपणे करण्यात आलेला नाही. या व्हेईक्युलर पुलावरील टपऱ्यांना बांधकाम शब्द वापरत अतिक्रमण असल्याने स्वतःहून तोडण्याच्या नोटीसा या राष्ट्रीय महामार्ग बांधकाम उपविभाग सहायक अभियंता श्रेणी १ च्या स्वाक्षरीने पाठविण्यात आल्या आहेत. यात राष्ट्रीय महामार्ग हद्दीत बांधकाम करून अतिक्रमण करणे हा दखलपात्र गुन्हा असून, नियंत्रण कायद्याचा भंग असल्याने हे बांधकाम न हटविल्यास 'अतिक्रमण बांधकाम हटविणे कारवाई' या विभागामार्फत करण्यात आल्यानंतर होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी टपरीधारक तसेच अतिक्रमण करणाऱ्यांचीच राहील, असे या नोटीसमध्ये नमूद केले आहे.

दरम्यान, या अतिक्रमण बांधकामधारकांना नोटीशी बजावण्यात आल्यानंतर त्यांनी सर्व्हिसरोडलगत झालेल्या अतिक्रमण बांधकामांवर आधी कारवाई करा, असे आव्हानच सोशल मिडीयामार्फत केले आहे. या पाच व्हेईक्युलर पुलांपैकी एका पुलावर मिनीडोर प्रवासी वाहतूक थांबा असून हा थांबा कोणीही हटविणार नाही, अशी ग्वाही मिळाली असल्याने त्सांना निर्धास्तपणा आला आहे.








● ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होणार असून त्याकरीता घटावर रंगीबेरंगी नक्षी काम करण्याचे काम पनवेलच्या कच्ची मोहल्यातील कुंभार प्रजापतीची सातवी पिढी करत आहे. तसेच, नवरात्रीला गरबा मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. याकरता लागणारे रंगीबेरंगी ड्रेस पनवेल येथे दिसायला लागले.
(छायाचित्र : राजेश डांगळे)

# नामदेव ठाकूर यांना पुरस्कार

**। उरण । वार्ताहर ।**

डोंगर परिसरात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या विविध समस्यांना शासनस्तरावर न्याय मिळवून देणारे नामदेव ठाकूर यांना नुकतेच राज्यस्तरीय कर्तृत्व गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. नामदेव ठाकूर हे उरण सामाजिक संस्थेचे सदस्य आहेत.



नामदेव ठाकूर यांच्या समाजकार्याची दखल या अगोदर विविध सामाजिक संस्थांबरोबर उरण तालुका तहसीलदार, पनवेल तालुका तहसीलदार, खालापूर तालुका तहसीलदार, पनवेल प्रांत आदिवासी विकास प्रकल्प पेण अशा शासकीय कार्यालयानेदेखील दखल घेऊन त्यांना सन्मानित केले होते. नामदेव ठाकूर यांनी आदिवासी बांधवांना शासकीय योजना मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पत्रव्यवहार करून पुढाकार घेतला आहे.

# तळा येथे सफाई कामगारांची तपासणी

**। तळा । वार्ताहर ।**

तळा नगरपंचायतीने 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०', 'स्वच्छता ही सेवा' व 'स्वभाव स्वच्छता' अभियानांतर्गत सफाई कामगार तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.२३) करण्यात आले होते. यावेळी मुख्याधिकारी मनीषा वजाळे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, डॉ. मोघे, इतर कर्मचारी, किशोर पितळे उपस्थित होते. यावेळी ११ सफाई कर्मचाऱ्यांची रक्तदाब, दमा, सर्दी खोकला आदी तपासणी करुन त्यांना टीटी इंजेक्शन दिले.




# पशुसंवर्धन विभागाच्या प्रयत्नाने गायीला जीवदान



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील गोमाशी येथील पशुपालक हरिदास गायकवाड यांच्या जर्सी गायीची दोन दिवसांपासून प्रसूती होत नसल्यामुळे पशुसंवर्धन विभाग सुधागड अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना नांदगाव यांच्याशी संपर्क साधला असता पशुसंवर्धन विभागाचे युवराज सुरकुले, सचिन ओहोळ, चंद्रकांत बर्गे, वारगुडे हे ताबडतोब पशुपालक गायकवाड यांच्या वाड्यावर उपस्थित झाले.

गायीच्या प्रसूतीदरम्यान वासरू गायीच्या पोटात दगावल्यामुळे ते फुगले. मृत वासराला बाहेर काढून गायीचे प्राण वाचविणे हे या सर्व पशुसंवर्धकांपुढे आव्हान होते. सलग तीन तासांच्या अथक प्रयत्नाने गायीच्या पोटातील वासरू बाहेर काढले व गायीला जीवनदान दिले.

# अनाथ मुलींना कपडे, खाऊचे वाटप

**। नेरळ । प्रतिनिधी।**

माथेरान येथील नितीन शाह आणि दीपक शाह यांच्या माध्यमातून नेरळजवळील धामोते येथे असलेल्या अनाथ मुलींच्या आश्रमात कपडे आणि खाऊ यांचे वाटप केले.



नेरळ-कळंब रस्त्यावर आगरी समाज हॉलच्या समोर आसरा अनाथ मुलींचे आश्रम आहे. या ठिकाणी समाजातील अनाथ मुलींचा सांभाळ करून त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम आसरा अनाथाश्रम करीत असते. याच अनाथ आश्रममध्ये राहणाऱ्या मुलींसाठी माथेरान येथील व्यावसायिक नितीन शहा आणि दीपक शहा यांच्या माध्यमातून कपडे आणि खाऊंचे वाटप करण्यात आले. यावेळी आसरा अनाथाश्रम मधुची व्यवस्थापिका सुवर्णा पिंगळे तसेच माथेरान येथील शिक्षक संघपाल वाठोरे आदी उपस्थित होते.

# विनापरवानगी तोडली कचराकुंडी

**ग्रामपंचायतीने गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायत हद्दी मधील खांडा गावातील कचरा कुंडी तोडण्यात आली आहे. ही कचराकुंडी तोडण्यासाठी कोणत्याही प्रकारचा आदेश ग्रामपंचायतीकडून देण्यात आला नव्हता. यामुळे कचरा कुंडी तोडणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल व्हावा आणि या ठिकाणी नव्याने कचरा कुंडी बांधून देण्याची मागणी मनसेचे सुभाष नाईक यांनी केली आहे. असे न केल्यास उपोषणाचा इशारा सुभाष यांनी दिला आहे. याबाबतचे पत्र त्यांनी दि.१८ सप्टेंबर रोजी नेरळ ग्रामपंचायतीला दिले आहे.



खांडा गावात ममदापुर-नेरळ स्टेशन रस्त्याच्या बाजूला असलेली कचरा कुंडी माजी ग्रामपंचायत सदस्यांने तोडली होती. याबाबत तात्काळ स्थानिक रहिवाशांनी विचारणा केल्यावर नवीन कचरा कुंडी बांधायची आहे, असे उत्तर सुभाष नाईक यांना त्या माजी ग्रामपंचायत सदस्याने दिले होते. मात्र, त्यानंतर आजतागात कचरा कुंडी बांधून देण्यात आली नाही. मात्र, याबाबत माहिती काढली असता नेरळ ग्रामपंचायतीकडून ही कचरा कुंडी तोडण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आली नव्हती. यामुळे सुभाष नाईक यांनी नेरळ ग्रामपंचायतीकडे दुसरे पत्र दिले असून, ग्रामपंचायत प्रशासनाने संबंधाची ठिकाणी कचरा कुंडी पुन्हा बांधून द्यावी आणि कचरा कुंडी तोडणाऱ्या माजी सदस्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच त्याच्या खर्चाने नवीन कचरा कुंडी बांधावी, अशी मागणी केली आहे.

# अंजुमन महाविद्यालयातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

देशभरात २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) हा युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार अंतर्गत राबविण्यात येणारा एक सार्वजनिक सेवा कार्यक्रम आहे. १९६९ साली महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली. या काळात भारतातील ३७ विद्यापीठांमध्ये ही योजना सुरू करण्यात आली होती, ज्यामध्ये ४० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. आता हि योजना संपूर्ण भारतात उच्च शिक्षण संस्थांमध्ये लागू असून लाखो विद्यार्थी सामाजिक कार्य करत आहेत.

या दिनाचे औचित्य साधून अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन या विषयावर जनजागृतीपर पथनाट्य मुरुड बाजारपेठेत सादरीकरण करून नागरिकांना प्लास्टिक व प्रदूषणाचे पर्यावरणावर होणारे परिणाम याबद्दल माहिती करून देऊन जागरूक करण्यात आले. भित्तीपत्रके, रांगोळी स्पर्धांसह विविध उपक्रम राबवून हा सप्ताह साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील रासेयोचे विद्यार्थी मोठ्यासंख्येने सहभागी झाले होते.

डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. फिरोज शेख, अल्ताफ फकीर, निदा गोरमे यांच्यासह खदिजा कुर्दी, खानसा नाखवाजी, सिमीन चोगले, नहरीन महाडकर, रिया तरे, श्रावणी रणदिवे, श्रिया खोत, स्वरा जंजीरकर, आलिया पित्तु यांनी विविध उपक्रम यशस्वी करण्यामध्ये अथक परिश्रम घेतले.




## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे. ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४
- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. फीडमिल प्लान्ट EICHER करीता TRANS परवानाधारक वाहनचालक पाहिजेत पगार १३०००/-+ भत्ता २००/५००/९०० TRIP नुसार संपर्क : HR अनुष्का राऊत - ७७९८८८३८६४
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९७६९४७४०६३
- काशिद बीच येथील गेस्ट हाऊस भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९५२७०६२४०८
- आमच्या अलिबाग येथील कार्यालयात एका कुशल टायपिस्टची गरज आहे. उमेदवाराने मराठी आणि इंग्रजी भाषेत उत्तम टायपिंग कौशल्य असावे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा. पत्ता : अष्टगंधा सोसायटी, रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ७७९८४०५३८३


जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### अक्कादेवीच्या जंगलात प्राणाची आहुती

# हुतात्म्यांना भूमीपुत्रांकडून मानाचा मुजरा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

ज्या देशभक्तांनी २५ सप्टेंबर १९३० रोजी आपल्या प्राणाची आहुती देऊन चिरनेर आक्कादेवीच्या जंगलात इतिहास घडवला. यावेळी अक्कादेवीच्या जंगलात आक्रमक स्वरूपाचा जंगल सत्याग्रह झाला. सविनय कायदेभंगाच्या या चळवळीत अनेकांनी हौतात्म्य पत्करले. त्या हुतात्म्यांची स्मृती जागविण्यासाठी पूर्वीच्या कुलाबा व आजच्या रायगड जिल्ह्यातील चिरनेर गावी २५ सप्टेंबर रोजी हुतात्मा स्मृतिदिन साजरा करण्यात येतो. या चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९४ व्या हुतात्मा स्मृतीदिन कार्यक्रमाची ऐतिहासिक चिरनेर गावात जोरदार तयारी सुरू असून, चिरनेर ग्रामपंचायत, रायगड जिल्हा परिषद व उरण पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२५) हा हुतात्मा स्मृतिदिन साजरा करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमासाठी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार विवेकानंद पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योगपती पी.पी. खारपाटील, जिल्हाधिकारी किसन जावळे, जेएनपीटीचे चेअरमन उन्मेश वाघ, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, अविनाश कोळी, राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड, बबन पाटील, आर. सी. घरत, विशाल नेहुल, संतोष ठाकूर, राजेंद्र खारपाटील, विनोद म्हात्रे, रवी भोईर, विकास नाईक, शुभांगी पाटील, यशोदा परदेशी, उद्धव कदम, समीर वाठारकर, राजेंद्र मिसाळ, दिनेश पाटील, रवींद्र पाटील, भूषण पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती सरपंच भास्कर मोकल व उपसरपंच सचिन घबाडी यांनी दिली. हा कार्यक्रम बुधवारी सकाळी ठीक ११.३० वाजता चिरनेर येथील हुतात्मा स्मृतीस्तंभाजवळ साजरा होणार आहे. यावेळी जंगल सत्याग्रहातील स्वातंत्र्यवीरांना पोलीस दलातर्फे बंदुकीच्या तीन फैरी झाडून व मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून, सलामी देत, शासकीय इतमात मानवंदना देण्यात येणार आहे. तसेच, हुतात्म्यांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

# तळा बाजारपेठेत स्वच्छता मोहीम

**। तळा । वार्ताहर ।**

द.ग. तटकरे व गो.म. वेदक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमातून तळा बाजारपेठेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. हा उपक्रम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सर्वत्र राबविला जात आहे. यावेळी दोन्ही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तळा बसस्थानक व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता केली. यावेळी कार्यक्रम अधिकारी शेख, डॉ. दत्ता कुंटेवाड, डॉ. बंगाळे, भगवान लोखंडे, थोरात, भरत चाळके यांसह नगरपंचायत कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ५९/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. बाळाराम राघ्या उघडा
मु. सागवाडी, बेलोशी, पो. मल्याण — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत कुर्डूस — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे सागवाडी, बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आजोबा कै. सोमा हिरू उघडा यांना मृत्यू दि. ०४/१०/१९८५ रोजी मौजे डांगी, कुर्डुस, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कुर्डूस येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत कुर्डूस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## पनवेल महानगरपालिका

**दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**

**''जाहीर आवाहन''**

पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती घटित करणेकरीता इतर मंडळ/संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४ - अ. दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ ( भाग-२-ख) अन्वये पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनसाठी विविध मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) व्यापारी संघ (१ सदस्य), यांचेकडील प्रतिनिधींची निवड करण्यात येईल. सदर संघाकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल.

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखा परीक्षा अहवाल सादर करील.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५. संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.०९/१०/२०२४ अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी नमुद संघाकडील इच्छुक व्यक्तींनी नामनिर्देशन अर्ज आवक जावक विभागास सादर करावेत. तद्नंतर पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती सदस्य नेमणूकीकरीता संघातील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. तरी इच्छुक व्यक्तीनी विहित वेळेमध्ये आपले अर्ज सादर करावेत. असे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

टिप : नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे एन.यु. एल. एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

सही/-
**(बाबासाहेब राजळे)**
उप आयुक्त तथा,
शहर प्रकल्प अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/DAY NULM/SUSV/२४२४/प्र.क्र.६/१७५/२०२४
दिनांक २४/०९/२०२४

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V,
Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

IIFL FINANCE

## सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २८.०९.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **नागोठणे–मोनालिसा कॉम्प्लेक्स, आयआयएफएल फायनान्स, नागोठणे शांती नगर, बाजार बेथ रोड, मुथूट फायनान्स समोर, नागोठणे, पिन– ४०२१०६** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL20105409, GL22030053, GL23068096, GL23197015, GL25270292, GL25433574, GL25434629, GL25735882, GL25739449, GL25988576, GL25988707, GL26784579, GL27024380, GL27071665, GL27089513, GL27190062, GL27380013, GL27391800, GL27689296, GL27712730, GL27753330, GL27762062, GL27772980, GL27774860, GL27790252, GL27942828, GL27960493, GL28225985, GL28247484, GL28322948, GL28324163, GL28362030, GL28740820, GL28759015, GL28847107, GL28865834, GL28973172, GL28984311, GL29001398, GL29067691, GL29072436, GL29172820, GL29175412, GL29223565, GL29227715, GL29372960, GL29881065, GL29903142, GL29915931, GL29917417, GL29927581, GL29927927, GL29999665, GL30076741, GL30092397, GL30112013, GL30166838, GL30186358, GL30272891, GL30444901, GL30449885, GL30532339, GL30543482, GL30730352, GL30736413, GL32181590, GL32181707, GL32728767, GL33299005, GL33609272, GL20863740, GL20866223, GL21147200, GL21614605, GL21674041, GL21731031, GL21930638, GL22035419, GL24358209, GL24752542, GL25270376, GL25296741, GL25296933, GL25502886, GL25504172, GL25521890, GL25547607, GL25547623, GL25560136, GL25562140, GL25688272, GL25707715, GL26149024, GL26162959, GL26168712, GL26514000, GL26539582, GL27009299, GL27065939, GL27270823, GL27274625, GL27515476, GL27516771, GL27619676, GL27764830, GL27771496, GL27818544, GL27828925, GL27981638, GL28033677, GL28050723, GL28195484, GL28205088, GL28210752, GL28212126, GL28261445, GL28271066, GL28424647, GL28673980, GL28695964, GL28961447, GL28965884, GL28966151, GL28976004, GL29040461, GL29165872, GL29208538, GL29220260, GL29226603, GL29282656, GL29288634, GL29295040, GL29437073, GL29441351, GL29446513, GL29463913, GL29468766, GL29474869, GL29627559, GL29635555, GL29766527, GL29767231, GL29828706, GL29844084, GL30199805, GL30209706, GL30313619, GL30318478, GL30593213, GL30611085, GL30618123, GL30624694, GL32548426, GL32836732, GL32849780, GL34027056, GL21993424, GL22189597, GL25981237, GL26006394, GL26990904, GL26994785, GL27028523, GL27050544, GL27229993, GL27244997, GL27455819, GL27573919, GL27579098, GL27872849, GL27895673, GL28107872, GL28117915, GL28320804, GL28325949, GL28334701, GL28353373, GL28379933, GL28420149, GL28431560, GL28436160, GL28454034, GL28696878, GL28723136, GL28769500, GL28790317, GL28855305, GL29019630, GL29185779, GL29201738, GL29284802, GL29470474, GL29490005, GL29496241, GL29653859, GL29658454, GL29713900, GL29718876, GL29934986, GL29940573, GL29955171, GL29956956, GL29990544, GL29994408, GL29996443, GL30005745, GL30006955, GL30024543, GL30248298, GL30252368, GL30253642, GL30413161, GL30476755, GL30735263, GL31377181, GL32588631, GL33104280, GL21347557, GL21808274, GL25415980, GL25692330, GL28489989, GL29248042, GL29441874, GL29483469, GL29497755, GL29720521, GL29741259, GL29831415, GL29844660, GL30117798, GL30297004, GL30317223, GL30328701, GL30343872, GL30573917, GL30596910, GL31496898, GL33267768, GL26877453, GL27465440, GL27480185, GL27558067, GL27578813, GL28006798, GL28321565, GL28326382, GL28340402, GL28355916, GL28451391, GL28453684, GL28622281, GL28640564, GL28649970, GL28669643, GL29005447, GL29066342, GL29071726, GL29335583, GL29352770, GL29725549, GL29743790, GL33100118, GL33852914, GL22864901, GL29157724, GL29176454, GL29479997, GL29497023, GL29575009, GL30198008, GL30209365, GL30229335, GL30232264, GL30667951, GL30683208, GL27784212, GL29580867, GL30195939, GL30210846, GL29394283, GL29494574, GL29896745, GL29904966, GL30166076, GL30185923, GL30623175, GL21152330, GL22160806, GL26289868, GL26397724, GL26417674, GL27790638, GL27854828, GL27863681, GL28166183, GL28182436, GL28220636, GL28244315, GL28957431, GL28976434, GL29645630, GL29659540, GL29699114, GL30327131, GL30343253, GL33110219, GL33393159.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला रिफंड असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**स्थळ: रायगड**
**तारीख: 25.09.2024**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V,
Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

IIFL FINANCE

## सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक २८.०९.२०२४** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **पनवेल–सेक्टर १९ जीएल, आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, गिरिजा आनंद बनवली , ग्रा. मजला, दुकान क्रमांक १/२/३, से–१९, स्टेशन रोड, विजय मार्ग , नवीन पनवेल–४१०२०६,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL27225226, GL29290659, GL29539970, GL29676868, GL29716995, GL29719346, GL30563933, GL22096833, GL22160851, GL22241742, GL28367094, GL28625924, GL29000039, GL29417345, GL29783083, GL29793595, GL29909406, GL29922669, GL29929334, GL29930558, GL30049523, GL30124483, GL30135490, GL30136187, GL30172366, GL30265722, GL30338677, GL30342735, GL30383573, GL30398793, GL30462771, GL30482236, GL30574263, GL30597051, GL30679175, GL30682100, GL21860656, GL26152049, GL26170128, GL28035863, GL28538971, GL28864173, GL29240340, GL29251196, GL29491071, GL29496499, GL29641350, GL29763867, GL30004815, GL30262324, GL30275109, GL30282706, GL30308141, GL30337307, GL30342045, GL30356939, GL30414158, GL30421876, GL30451759, GL30463106, GL30479029, GL30482282, GL30483383, GL30508863, GL30538371, GL30551876, GL30559385, GL30615125, GL30618893, GL30706971, GL30715696, GL22021423, GL25231491, GL25831352, GL26193775, GL27664702, GL27670119, GL28262915, GL28972291, GL29188683, GL30291672, GL21978825, GL22540310, GL27317190, GL29841772, GL29842439, GL29966272, GL29982485, GL30051699, GL30090530, GL30108415, GL30176362, GL30329560, GL30344113, GL31388346, GL21643652, GL22062378, GL22161077, GL22169810, GL22737054, GL24932985, GL26756627, GL26965011, GL26981150, GL27014702, GL27021973, GL27039141, GL27039609, GL27049069, GL27052344, GL27416545, GL27632279, GL27638303, GL27755364, GL28071459, GL28097196, GL28118767, GL28308945, GL28348519, GL28354843, GL28365824, GL28397396, GL28623963, GL28630146, GL28638734, GL28640919, GL28912632, GL28926431, GL29013745, GL29367614, GL30268014, GL30268516, GL30279166, GL30604761, GL30615657, GL30628053, GL30707883, GL30709885, GL32140006, GL32203006, GL32846405, GL27052685, GL28515875, GL28647908, GL28669104, GL29563683, GL30026617, GL30225258, GL30330335, GL30344261, GL30606055, GL30703604, GL30714102, GL31709860, GL31726053, GL21757756, GL27884348, GL28287621, GL28304675, GL28595900, GL29117223, GL29127350, GL30174189, GL30177758, GL30188316, GL30418076, GL30537599, GL30673909, GL30684312, GL25634021, GL28958785, GL28986415, GL29241939, GL29322118, GL30662790, GL30682051, GL24365087, GL24370476, GL27194004, GL27216281, GL28365178, GL29206198, GL29225980, GL29418271, GL29597983, GL29609695, GL29790332, GL29795343, GL29977042, GL30082468, GL30183481, GL30389895, GL30400315, GL30662761, GL30682062, GL30689888, GL30698335, GL30711664, GL32053927, GL33139011, GL22027584, GL24764813, GL27143711, GL27163213, GL27445891, GL27449615, GL27836564, GL27862606, GL28028794, GL28227144, GL28332979, GL28416717, GL28635069, GL28638147, GL28852087, GL29717709, GL29752605, GL29768032, GL30662451, GL30665080, GL30681797, GL30682662, GL31020505, GL33486484, GL20963664, GL22068075, GL26964022, GL27058908, GL28519486, GL28626605, GL28973848, GL29123131, GL29221999, GL29227344, GL29670709, GL29682702, GL33764447, GL33854955.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला रिफंड असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**स्थळ: रायगड (एम. एच)**
**तारीख: 25.09.2024**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

## जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आमचे अशील हे सौ. मृदुला अशोक हरचंद्राई आणि श्रीम. मृणालिनी अशोक हरचंद्राई **(मालक)** यांच्यासह अलिबागच्या नोंदणीकृत उप-जिल्ह्यामधील आणि रायगडच्या नोंदणीकृत जिल्ह्यामधील आणि तालुका पंचायत समिती, अलिबाग, जिल्हा परिषदेमधील झिरदच्या ग्राम पंचायतीच्या हद्दींमधील झिरदच्या महसुल गावामध्ये वसलेल्या, असलेल्या आणि स्थित येथे खालील लिखित **परिशिष्टात** अधिक तपशीलवारपणे वर्णिलेल्या मोजमापित ४-२४-४० (एचए) म्हणजेच ४२,४४० चौ. मी. जमिनीपैकी मोजमापित अंदाजे ३०,००० चौ. मी. जमिनीच्या त्या सर्व भागाच्या संदर्भातील त्यांचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध यांच्या हस्तांतरण आणि अभिहस्तांकनाकरिता वाटाघाटी करत आहेत.

कोणतीही व्यक्ती/क्तीं, संस्था, हक्कदार, संस्था आणि किंवा कंपनी/न्या ज्यांना सदर जमिन किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, गहाण, अदलाबदल, भेट, विभागणी, धारणाधिकार, प्रभार, भाडेपट्टा, उप भाडेपट्टा, परवाना, पोट परवाना, निर्वाह, वारसा, विश्वस्त, सुविधाधिकार, अभिहस्तांकन, संपादन, पुनर्संपादन, चिरभोगाचा हक्क किंवा अग्रक्रयाधिकार, कोणत्याही करारांतर्गत, कोणताही वाद किंवा कोणतेही न्यायालय / न्यायिक अधिकारी, अर्ध-न्यायिक अधिकारी किंवा कोणतेही प्रशासकीय अधिकारी यांच्याद्वारे पारित हुकूम किंवा निषेधाज्ञा आदेश किंवा जप्ती किंवा कोणत्याही अदलाबदलीच्या सुकृताद्वारे, कुळमुख्त्यारपत्र, इच्छापत्र, अंत्यदान, - कुळवहिवाट, कुटुंब व्यवस्था / तडजोड / ताबा / वाटप, प्रलंबित किंवा धमकावलेले वाद किंवा अन्य कसेहीच्या मार्गे समाविष्टित कोणतेही आक्षेप किंवा कोणतेही दावे, हक, नामाधिकार आणि/किंवा हितसंबंध असल्यास याद्वारे तसे लिखित स्वरूपात पुरक दस्तावेजांसह निम्नस्वाक्षरीकारांना येथे खालील नमूद पत्त्यावर सदर प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास, असे मानले जाईल की, सदर जमिन ही कोणतीही व्यक्ती/क्तीं, संस्था, हक्कदार, कंपन्या, इ. द्वारे किंवा त्यांचे कोणतेही दावे, हक आणि/किंवा हितसंबंधांपासून मुक्त आहे आणि सदर जमिनीमधील कोणत्याही तशा प्रस्तावित दावा किंवा हितसंबंधांच्या कोणत्याही संदर्भ किंवा संबंधांशिवाय आमचे अशील सदर व्यवहारात प्रवेश करतील आणि सर्व तसे दावे जर काही असल्यास ते सर्व हेतू आणि कारणांकरिता त्यागित मानले जातील आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक नसतील.

**वरील उल्लेखित परिशिष्ट**

अलिबागच्या नोंदणीकृत उप-जिल्ह्यामधील आणि रायगडच्या नोंदणीकृत जिल्ह्यामधील आणि तालुका पंचायत समिती, अलिबाग, जिल्हा परिषदेमधील झिरदच्या ग्राम पंचायतीच्या हद्दींमधील झिरदच्या महसुल गावामध्ये वसलेल्या, असलेल्या आणि स्थित मोजमापित ४-२४-४० (एचए) म्हणजेच ४२,४४० चौ. मी. जमिनीपैकी मोजमापित अंदाजे ३०,००० चौ. मी. जमिनीचे ते सर्व भागआणि खालीलप्रमाणे सीमाबद्धताः

पूर्वेला किंवा त्यादिशेने : नाल्याद्वारे
पश्चिमेला किंवा त्यादिशेने : गट क्र. ११५ आणि गट क्र. ११६ द्वारे
दक्षिणेला किंवा त्यादिशेने : नाल्याद्वारे
उत्तरेला किंवा त्यादिशेने : गट क्र. ५४ द्वारे.

सदर दिनांक २५ सप्टेंबर, २०२४.

**मालवी रणछोडदास अँड कं.**
भागीदार
वकील आणि सॉलिसिटर्स

दिनांक : २५ सप्टेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| सुंदराबाई गोपाळ शेळके | ४८ | २/ ब | ०-३१-४० | १ | ९२ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २५/०९/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, मौजे कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २०/३ क्षेत्र ०-३७-९० (हे.आर) आकार ८.८७ (रू. पैसे) पैकी माधुरी माधव उर्फ महादेव नाईक, लता अशोक पाटील, प्रभावती परशुराम नाईक, भारती भास्कर प्रधान व मंदा उर्फ स्नेहलता गजानन वर्तक यांच्या सामाईक मालकीच्या ०-२०-०० (हे. आर) आकार ४.५३ (रू. पैसे) क्षेत्राची मिळकत आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबत वर नमूद विद्यमान मालकांनी सांगितले आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही, कसलाही हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख: २४.०९.२०२४.

**(ॲड. संदेश जगन्नाथ म्हात्रे)**
कार्या. अे-१०१/१११,
त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

वादी यांचे वकिल
ॲड. सविता पिंगळे

प्रोसेस जमा

**जाहीर नोटीस**

अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधिश स्तर सो. यांचे कोर्टात
रेग्यु मुकदमा नं. १३४/२०२२
निशाणी क्र. ४४

भुपेंद्र नारायण पाटील वगैरे ४ -- वादी
विरूद्ध
मोहन चंद्रकांत घरत व २७ -- प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी नं. ३) सुजाता रामचंद्र घरत
रा. डावरे, पो. जोहे, ता. पेण जि. रायगड ४०२१०७
२०) सौ. बेबी परशुराम पाटील
रा. काळुंद्रे, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६

सदरील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरूद्ध मे. दिवाणी न्यायाधिश स्तर सो. यांचे कोर्टात दाखल केला असुन या दाव्यामध्ये सुनावणीकरिता पुढील तारीख २५/१०/२०२४ नियुक्त करण्यांत आलेली आहे.

सदरचे दाव्याच्या सुनावणीकामी प्रतिवादी नं. ३ व २० हयांस वरील पत्त्यावर नोटीसा काढल्या असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी या नोटीसीद्वारे प्रतिवादी नं. ३ व २० हयांस कळविणेत येते की, सदर दाव्याचे सुनावणीची पुढील तारीख २५/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सदर वेळेस तुम्ही स्वतः अगर तुमचे तर्फे तुमचे एजंट, वकिल वगैरे यांचेमार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा तुम्हांस सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजुन दाव्याची सुनावणी एकतर्फी घेऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

अलिबाग
ता. २१/०९/२०२४

| सही/- | सही/- |
|---|---|
| **लिपिक** | **अधिक्षक** |
| **दि. न्या. व. स्तर** | **दि. न्या. व. स्तर** |
| **अलिबाग** | **अलिबाग रायगड.** |

वादी यांचे वकिल
ॲड. सविता पिंगळे

प्रोसेस जमा

**जाहीर नोटीस**

अलिबाग येथील मे.दुसरे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे कोर्टात
रे मु. मुकदमा नं. १३३/२०२२
निशाणी क्र. ४२

भुपेंद्र पाटील -- वादी
विरूद्ध
मोहन घरत -- प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी नं. ३) सुजाता रामचंद्र घरत
रा. डावरे पो. जोहे
ता. पेण जि. रायगड ४०२१०७

सदरील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरूद्ध मे. दिवाणी न्यायाधिश स्तर सो. यांचे कोर्टात दाखल केला असुन या दाव्यामध्ये सुनावणीकरिता पुढील तारीख २५/१०/२०२४ नियुक्त करण्यांत आलेली आहे.

सदरचे दाव्याच्या सुनावणीकामी प्रतिवादी नं. ३ हयांस वरील पत्त्यावर नोटीसा काढल्या असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी या नोटीसीद्वारे प्रतिवादी नं. ३ हयांस कळविणेत येते की, सदर दाव्याचे सुनावणीची पुढील तारीख २५/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सदर वेळेस तुम्ही स्वतः अगर तुमचे तर्फे तुमचे एजंट, वकिल वगैरे यांचेमार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा तुम्हांस सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजुन दाव्याची सुनावणी एकतर्फी घेऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

अलिबाग
ता. २१/०९/२०२४

| सही/- | सही/- |
|---|---|
| **लिपिक** | **अधिक्षक** |
| **दि. न्या. व. स्तर** | **दि. न्या. व. स्तर** |
| **अलिबाग** | **अलिबाग रायगड.** |

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-तिवरे, तालुका-कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १. हरिश्चंद्र वामन म्हात्रे<br>२. हिरालाल वामन म्हात्रे<br>३. पार्वती यशवंत नारंगीकर<br>४. राजेश प्रभाकर पाटील<br>५. हेमंत प्रभाकर पाटील<br>६. सविता निळकंठ भोईर | ४७ | १ | १-०६-२० | २१-०५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०९/२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता.घर क्र.३,नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

दि.२४/०९/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकती कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतींच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री. विनोद एकनाथ पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरच्या मिळकती या निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**-: मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग/गट नं. | क्षेत्र | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कुर्डुस ता. अलिबाग | ७१ | ०-३१-६०<br>पो.ख. ०-०६-८०<br>एकुण ०-३८-४० | ०.८६ |
| कुर्डुस ता. अलिबाग | ७२ | ०-१७-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण ०-२०-०० | ०.३० |

वर वर्णन केलेली मिळकतीमधील गट नं. ७१ क्षेत्र ०-३८-४० हे. आर. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१३-२० हे. आर. पो.ख. ०-०६-८० हे.आर. एकुण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. आकार ०.३६ रू. पै. व गट नं. ७२ ची संपुर्ण मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी-आंबेघर) पो. पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

निवडक

## अजिंक्य रहाणेकडे नेतृत्व

**मुंबई :** इराणी चषकासाठी मुंबईने अनुभवी अजिंक्य रहाणेकडे कर्णधारपद सोपवले आहे. श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूर यांचाही संघात समावेश असेल. श्रेयसने दुलीप ट्रॉफीमध्ये भाग घेतला होता, तर शार्दुल दुखापतीनंतर पुनरागमन करत आहे. तर रहाणे नुकताच इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळत होता. मुंबईचा सामना इराणी चषकात शेष भारताशी होणार आहे. लखनौच्या एकाना स्टेडियमवर १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान हा सामना खेळवला जाणार आहे.

## इंग्लीश कर्णधाराला दंड

**लंडन :** इंग्लंडची कर्णधार हीदर नाइटला एक हजार युरो (सुमारे ९२ हजार रुपये) दंड ठोठावण्यात आला आहे. १२ वर्षे जुना फोटो पुन्हा व्हायरल झाल्याने नाइटला हा दंड ठोठावण्यात आला आहे. ३३ वर्षांची हीदर २०१२ मध्ये स्पोर्ट्स स्टारच्या किटी पार्टीमध्ये ब्लॅक फेस असलेल्या फॅन्सी ड्रेसमध्ये दिसली होती. हा फोटो १२ वर्षे जुना आहे. जो पुन्हा व्हायरल होत आहे. मात्र, इंग्लिश कर्णधाराने माफी मागितली आहे. यूएईमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत तिला इंग्लंडचे कर्णधार बनवण्यात आले आहे.

## विनेशने माफी मागावी

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारताचा कुस्तीपटू योगेश्वर दत्तने विनेश फोगटला संपूर्ण देशाची माफी मागायला सांगितली आहे. जास्त वजनामुळे विनेशला ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत अपात्र ठरवण्यात आले. लंडन ऑलिम्पिकचा कांस्यपदक विजेता योगेश्वर दत्त म्हणाला, विनेश फोगटला ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरवण्यात आले होते, जर एखादा खेळाडू अपात्र ठरला असेल तर त्याने संपूर्ण देशासमोर माफी मागितली पाहिजे, असे दत्तने म्हटले आहे.

## भारताला नामी संधी

**कानपूर :** भारत आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना २७ सप्टेंबरपासून कानपूरमध्ये खेळवला जाणार आहे. चेन्नई कसोटी २८० धावांनी जिंकून भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. कानपूर कसोटी जिंकून संघ आता मालिकेवर कब्जा करू शकतो. तर बांगलादेशला दुसरा सामना जिंकून मालिका बरोबरीत आणण्याची संधी आहे. सर्वाधिक कसोटी जिंकण्याच्या बाबतीत भारताला दक्षिण आफ्रिकेला मागे सोडण्याची संधी देखील या निमीत्ताने चालुन आली आहे.

## तर पाकिस्तानचे नुकसान

**लाहोर :** पुढील वर्षी मार्चमध्ये पाकिस्तानमध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आयोजित केली जाणार आहे. पीसीबीने तीन वर्षांसाठी मीडिया हक्कांसाठी २१ दशलक्ष डॉलर्सची मागणी केली आहे. एवढी रक्कम देण्यासाठी पीसीबीला अद्याप खरेदीदार मिळालेला नाही. दोन पाकिस्तानी कंपन्यांनी संयुक्तपणे ४.१ दशलक्ष डॉलर्सचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र पीसीबीने हक्क विकण्यास नकार दिला. जर मीडिया हक्क विकले गेले नाही तर पाकिस्तानचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊ शकते.

**राज्य सरकारने प्राईम लोकेशनची जागा दिली**

# अजिंक्य रहाणे उभारणार जागतिक दर्जाची अकादमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

येथील वांद्रे परिसरात जागतिक दर्जाचे क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेला २,000 चौरस मीटर जमीन भाडेतत्त्वावर देण्यास महाराष्ट्र मंत्रिमंडळाने सोमवारी मंजुरी दिली आहे. १९८८ मध्ये महान क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना इनडोअर ट्रेनिंग अकादमी स्थापन करण्यासाठी हा भूखंड देण्यात आला होता. मात्र, तेथे कोणताही प्रकल्प उभारला नसल्याने ती जमीन गावस्कर यांच्याकडून काढून घेत आता रहाणेला भाडेपट्ट्याने दिली आहे.



### सुनील गावसकर यांच्याकडून सरकारने भूखंड का काढून घेतला?

इनडोअर क्रिकेट ट्रेनिंग अकादमी विकसित करण्यासाठी ३६ वर्षांपूर्वी गावसकर यांना प्रथम भूखंड वाटप करण्यात आला होता, असे कॅबिनेट नोटमध्ये म्हटले आहे. विकासा अभावी शासनाने हा भूखंड परत माघारी घेतला. झोपडपट्टीतील रहिवासी अयोग्य कारणांसाठी भूखंड वापरत असल्याने हा भूखंड वाईट अवस्थेत असल्याचे सरकारने म्हटले आहे.

### अजिंक्यला तीस वर्षे भाडेतत्त्वावर मिळाली जमीन

अत्याधुनिक क्रीडा सुविधा विकसित करण्यासाठी क्रिकेटपटू अजिंक्य रहाणेला ३० वर्षांच्या लीजवर जमीन देण्याच्या महसूल विभागाच्या प्रस्तावाला महाराष्ट्र मंत्रि मंडळाने मंजुरी दिली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. हा भूखंड रहाणे याला भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव म्हाडा (महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण) कडून मंजूर करण्यात आला होता. त्याला मंत्री मंडळाच्या परिषदेने मंजुरी दिली. सुनील गावसकर क्रिकेट फाऊंडेशन ट्रस्टला दिलेला हा भूखंड मे २०२२ मध्ये राज्य सरकारला परत करण्यात आला होता.

### प्राइम लोकेशन असूनही अकादमी बांधली गेली नाही

२०२१ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या गृहनिर्माण मंत्र्यांनी सुनील गावसकर यांनी अकादमीसाठी कोणतेही काम केले नसल्याचा खुलासा केला होता. प्राइम लोकेशन असूनही तिथे चांगली क्रिकेट अकादमी बांधली गेली नाही. गावसकर यांनी भारतासाठी १२५ कसोटी आणि १०८ एकदिवसीय सामन्यांमध्ये अनुक्रमे १०,१२२ आणि ३०९२ धावा केल्या. दीर्घकाळापर्यंत कसोटीत सर्वाधिक ३४ शतकांचा विक्रम गावसकरांच्या नावावर होता, जो नंतर सचिन तेंडुलकरने मोडला.

# बासित अलीने पीसीबीला फटकारले

**खेळपट्टीचे महत्व भारताकडून शिकण्याचा दिला सल्ला**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या विजयानंतर पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू बासित अलीने पीसीबीवर टीका केली आहे. आमच्या इथे अज्ञानी लोक आहेत. ज्यांना खेळपट्टीचे महत्त्व माहित नाही. भारतात पाकिस्तानसारखी व्यवस्था नाही, असे खडे बोल त्यांनी सुनवाले आहेत.



भारताने रविवारी बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात २८० धावांनी दणदणीत विजय नोंदवला. चेन्नईच्या मैदानावर भारताने ५१५ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करायला उतरलेल्या बांगलादेशला रोहित ब्रिगेडने सामन्याच्या चौथ्या दिवशी २३४ धावांत गुंडाळले. चौथ्या डावात फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने ६ आणि रवींद्र जडेजाने तीन विकेट्स घेतल्या होत्या. जसप्रीत बुमराहने संपूर्ण सामन्यात पाच विकेट्स घेतल्या. अश्विनने सहा, जडेजाने पाच तर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे भारतीय गोलंदाजांनी एकूण २० विकेट्स घेतल्या. कारण त्यांच्या गोलंदाजांनी आपापले काम चोखपणे पार पाडले. चौथ्या डावात चेंडू वळणार हे टीम इंडियाला माहित होते. म्हणून त्यांनी फक्त दोन फिरकीपटू उतरवले. याचे श्रेय पिच क्युरेटरला जाते. अशी खेळपट्टी कशी बनवायची ज्यावर कसोटी खेळली जाते आणि विजयी होता येते. हे त्यांना माहीत आहे. त्यांची व्यवस्था आपल्यासारखी नाही, असे बासित अली म्हणाला. आपल्या देशात खेळपट्टीला महत्त्व नसते. कारण ते अज्ञानी लोक आहेत. हे सामान उचलून क्रिकेट खेळणारे लोक आता क्रिकेट बोर्ड चालवत आहेत. खेळपट्टी समजून घेतल्यावरच पन्नास टक्के प्रश्न सुटतो. सुनील गावसकर आणि जावेद मियांदाद यांना खेळपट्टी समजून घेण्याचे महत्त्व विचारा, असेही तो म्हणाला.

# बार्सिलोनाची घोडदौड, व्हिलारेयालवर मात

**। माद्रिद । वृत्तसंस्था ।**

बार्सिलोना संघाने स्पॅनिश लिग फुटबॉलमधील आपली विजयी मालिका सहाव्या सामन्यातही कायम राखल्याचे दिसून आले. बार्सिलोनाच्या संघाने यजमान व्हिलारेयालवर ५-१ अशी जोरदार मात केली.



**गोलरक्षक जायबंदी**

मात्र, या सामन्यात बार्सिलोनाचा गोलरक्षक टर स्टेगनच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्याला काही महिने मैदानाबाहेर राहावे लागणार आहे. मध्यंतरापूर्वी काही क्षण आधी गोलजाळीत येणाऱ्या चेंडूला हवेत उडी मारून अडवताना खाली येताना स्टेगन विचित्र पद्धतीने गुडघ्यावर आपटला. या दुखापतीत त्याचा उजवा गुडघा निखळल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याला स्टेडियममधून रुग्णवाहिकेतून नेण्यात आले. त्यानंतर तो व्हीलचेअरवरून रुग्णालयातून बाहेर पडताना दिसला. 'स्टेगनची दुखापत गंभीर दिसून येत असून, आमच्यासाठी हा मोठा धक्का आहे,' असे बार्सिलोनाचे प्रशिक्षक हॅन्सी फ्लिक यांनी सांगितले.

दरम्यान, व्हिलारेयालविरुद्ध बार्सिलोनासाठी पूर्वार्धात रॉबर्ट लेवांडोवस्कीने दोन, तर उत्तरार्धात राफिनियाने दोन आणि पाब्लो टोरेने एक गोल केला. लेवांडोवस्कीचे सहा सामन्यांत सहा गोल झाले असून, सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंमध्ये तो आघाडीवर असल्याने चाहते खुश आहेत.

# दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडियात होणार दोन बदल?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने रविवारी (२२ सप्टेंबर) चौथ्या दिवशीच २ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात बांगलादेशचा पराभव केला. यानंतर लगेचच बीसीसीआयने दुसऱ्या कसोटी संघाची घोषणा केली. बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी संघात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पहिल्या कसोटीचाच संघ दुसऱ्या कसोटीसाठी कायम ठेवण्यात आला आहे. आता दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी प्लेईंग इलेव्हनमध्ये काही बदल होण्याची शक्यता आहे.



भारतीय संघ चेन्नईच्या लाल मातीच्या खेळपट्टीवर ३ वेगवान गोलंदाज आणि २ फिरकीपटूंसह मैदानात उतरला होता. आता संघ कानपूरच्या काळ्या मातीच्या खेळपट्टीवर ३ फिरकी गोलंदाज आणि २ वेगवान गोलंदाजांसह मैदानात उतरू शकतो. यामुळे टीम इंडियामध्ये कानपूरचा खेळाडू कुलदीप यादवला त्याच्या घरच्या मैदानावर खेळण्याची संधी मिळू शकते. बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये रोहित शर्मा २ बदल करण्याची शक्यता आहे. दोन्ही बदल गोलंदाजी युनिटमध्ये होऊ शकतात. भारताला अनेक कसोटी सामने खेळायचे असल्याने, जसप्रीत बुमराह किंवा मोहम्मद सिराज यापैकी एक गोलंदाजाला विश्रांती मिळू शकते. सिराज-बुमराह पैकी एका गोलंदाजाला विश्रांती दिल्यास उत्तर प्रदेशचा युवा खेळाडू यश दयाललाही पदार्पणाची संधी मिळू शकते किंवा आकाशदीपच्या जागी खेळू शकतो. आकाशदीपने आतापर्यंत मिळालेल्या संधींमध्ये आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. यश दयालला आजमावण्याचा संघ प्रयत्न करेल. स्टार गोलंदाज मोहम्मद शमीचेही न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत पुनरागमन होण्याची शक्यता आहे. काळ्या मातीची खेळपट्टी फिरकीपटूंना मदत करणारी असेल. त्यामुळे रोहित शर्माला अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्यापैकी एकाची निवड करावी लागेल.

# वुमन्स टी २० वर्ल्डकपसाठी सर्व जबाबदारी महिलांच्या खांद्यावर

**■ सामनाधिकारी, पंच या सर्व भूमिका त्याच बजावणार**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वुमन्स टी वर्ल्डकप स्पर्धेला ३ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतासह दहा संघ सज्ज झाले आहेत. या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा दबदबा राहिला आहे. तसेच इंग्लंड आणि वेस्ट इंडिजने एक-एकदा वर्ल्डकप जिंकला आहे. भारतीय महिला संघ यंदा जेतेपद मिळवेल का, असा प्रश्न क्रीडारसिकांना पडला आहे. असं असताना आयसीसीने एक मोठी घोषणा केली आहे. पहिल्यांदाच संपूर्ण स्पर्धेत महिलाराज पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेत सामनाधिकारी असो की पंच, या सर्व भूमिका महिलाच बजावणार आहेत. आयसीसीने याबाबतची अधिकृत घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयाचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे. दरम्यान, या स्पर्धेसाठी १० पंच, तीन सामनाधिकाऱ्यांसह एकूण १३ जणांची अधिकृत घोषणा बीसीसीआयने केली. अंतिम सामना २० ऑक्टोबरला होणार आहे.



# कोणाची बॅट जास्त महाग? विराट की बाबर

**। मुंबई । वृत्तसंस्था।**

क्रिकेट जगतातील मोठ्या फलंदाजांचा विचार केला तर भारताच्या विराट कोहलीसोबत पाकिस्तानच्या बाबर आझमचेही नाव घेतले जाते. दोन्ही खेळाडू आपापल्या देशांचे कर्णधार राहिले आहेत. जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक आहेत. पण हे दोघे कोणती बॅट वापरतात आणि त्यांच्या बॅटची किंमत किती आहे हे तुम्हाला माहिती आहे का?

विराटकोहली स्टिकर असलेली बॅट वापरतो. विराट कोहलीच्या बॅटची खासियत म्हणजे त्याची ग्रेन लाइन. विराट कोहलीच्या बॅटचे वजन सुमारे १.१५ किलो आहे, जे फलंदाजीसाठी योग्य मानले जाते. अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये या बॅटची किंमत भारतीय बाजारात सुमारे २७,००० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय कोहलीचा एमआरएफसोबत १०० कोटी रुपयांचा मोठा करार आहे. हा करार २०१७ मध्ये सुरू झाला जो आठ वर्षांचा असेल.

बाबर आझम ग्रे-निकॉल्स हायपरनोव्हा १.३ क्रिकेट बॅट वापरतो. ही एक जुनी आणि प्रतिष्ठित ब्रिटीश कंपनी आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये बाबरच्या बॅटची किंमत भारतीय रुपयांमध्ये सुमारे ४५,३०० रुपये आहे.

# दुलीप ट्रॉफीत फायनल न होताच विजेता मिळतो

**■ पूर्वी विभागीय स्पर्धा असायची, यंदा ती चार संघांमध्ये खेळवली गेली**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दुलीप ट्रॉफी २०२४ चे जेतेपद मयंक अग्रवालच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने पटकावले आहे. भारत ए संघाने भारत सी संघाचा १३२ धावांनी पराभव करत दुलीप ट्रॉफीचे जेतेपद जिंकले आहे. यंदाच्या दुलीप ट्रॉफीमध्ये ४ संघ सहभागी झाले होते. भारत ए, भारत बी, भारत सी, भारत डी. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) यंदा देशांतर्गत खेळाडूंना दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी होणे बंधनकारक केले होते. त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय संघातील अनेक खेळाडू या स्पर्धेत खेळत होते. यापूर्वी दुलीप ट्रॉफी ही विभागीय स्पर्धा असायची. पण यंदा ती चार संघांमध्ये खेळवली गेली.

आगामी आंतरराष्ट्रीय कसोटी हंगामासाठी सर्वोत्कृष्ट भारतीय संघ तयार करण्याच्या कल्पनेने ही स्पर्धा नवीन स्वरूपात खेळवली गेली आणि पहिल्याच बांगलादेश कसोटी सामन्यात याचा प्रत्यय पाहायला मिळाला.



### स्पर्धेत फायनल न होता कसा मिळाला विजेता?

दुलीप ट्रॉफी २०२४ मध्ये चार संघ सहभागी झाले होते. दुलीप ट्रॉफी स्पर्धा ही राऊंड रॉबिन पद्धतीने खेळवली गेली. या स्पर्धेत एकूण ३ फेऱ्या खेळवण्यात आल्या. या चारही संघांना एकमेकांविरूद्ध सामने खेळायचे होते. म्हणजेच प्रत्येक संघाने तीन सामने खेळले. या तिन्ही सामन्यानंतर जो संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानी असेल तो संघ विजेता घोषित केला गेला.

### २२ सप्टेंबर रोजी या स्पर्धेचा शेवटचा सामना खेळण्यात आला

या सामन्यात विजय मिळवत भारत ए संघाने १२ गुणांसह या स्पर्धेचे जेतेपद मिळवले. भारत ए संघाने ३ पैकी २ सामने जिंकले तर पहिला सामना गमावला होता. भारत सी संघ या स्पर्धेत ९ गुणांसह दुसऱ्या स्थानी राहिला आहे. भारत सी संघाने ३ पैकी १ सामना गमावला १ सामना जिंकला तर एक सामना अनिर्णित राहिला. भारत बी संघह ७ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे. तर भारत डी संघ ६ गुणांसह चौथ्या स्थानी आहे. २ सामने गमावले तर एक सामना डी संघाने जिंकला आहे.

# कबड्डीची पंढरी बहरतेय



**■ कबड्डी असोसिएशनचा ६९ वा वर्धापनदिन**

**देविदास म्हात्रे**

आज रायगड जिल्ह्यात कबड्डीचा दरारा सर्वत्र आहे. परंतु एक काळ असा होता की, रायगडची कबड्डी नावारूपाला आणण्यामध्ये बुवा साळवींचा सिंहाचा वाटा आहे. बुवा साळवी यांनी प्रभाकर पाटील यांच्या मदतीने रायगड जिल्ह्यात कबड्डीचा पाया २५ सप्टेंबर १९५५ रोजी घातला. आज या कार्याला ६९ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यावेळी कुलाबा कबड्डी असोसिएशन म्हणून ओळखले जात होते. खऱ्या अर्थाने रायगड जिल्ह्याला कबड्डीने पाच छत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू दिले. तर, दोन छत्रपती पुरस्कार संघ व्यवस्थापक दिले. रायगड जिल्ह्यातूनच पेणमधील 'काळभैरव' संघातील खेळाडू विजय म्हात्रे यांना कबड्डी योध्दा विजू पेणकर यांच्या सान्निध्याने शिवछत्रपती पुरस्कार तसेच आंतरराष्ट्रीय देशात खेळण्यास संधी मिळाली. भारतीय कबड्डी संघात त्याने प्रतिनिधीत्व केले होते. साळवींच्याच प्रेरणेने रायगडातील पेणमधील बेणेघाट येथील प्रमोद म्हात्रे, बोरी येथील संजय म्हात्रे, शहाबाज येथील सुधीर पाटील, बोर्वे येथील आशिष म्हात्रे हे छत्रपती पुरस्काराने सन्मानित झाले. तर, ते आंतरराष्ट्रीय खेळाडू ठरले. त्यांनी संजय म्हात्रे, गजानन बोरकर, प्रमोद म्हात्रे, तसेच सुधीर पाटील यांनाही आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळात नेतृत्व करण्याची संधी मिळाली. मुंबई उपनगर संघातून खेळलेल्या पण दिव-पेण ही जन्मभूमी असलेल्या महिला खेळाडू अभिलाषा शशिकांत म्हात्रे यांना शिवछत्रपती पुरस्कार तसेच अर्जून पुरस्कारदेखील मिळाला होता. महिला कबड्डीला राष्ट्रीय पातळीवर नेण्यात बुवांचा सिंहाचा वाटा असून, त्यांच्यामुळे १९५५ मध्ये महिला कबड्डी सामन्यांचा राष्ट्रीय कबड्डीत समावेश झाला.

२००२ साली १४ वी आशियाई क्रीडा स्पर्धा दक्षिण कोरीयातील 'बुसान' येथे झाल्या. बुसान एशियाडमध्ये आधुनिक कबड्डी उदयास आली. मातीवर कबड्डी खेळवण्यात अडचण येईल, असे कारण द. कोरियाने सांगितले. त्यामुळे २००२ सालापासून हे सामने चटईवर (मॅट) खेळविले जाऊ लागले. कबड्डीमुळे भारताला जवळ जवळ दहा सुवर्णपदके मिळाली. कबड्डी नसती तर भारताला फारसे सुवर्णपदक मिळाले नसते. बुवांची कबड्डी त्यांच्यामुळे व रायगडमुळे सातासमुद्रपार गेली. आज कबड्डी ही १९ देशात खेळली जाते. मात्र, इराणचा कबड्डी संघ भारताला जशास तसे उत्तर देतो. रायगड जिल्ह्यातून प्रो कबड्डीसाठी केदार लाल, अनिल पाटील, मयुर कदम हे खेळाडू सध्या रायगडचा नाव गाजवत आहेत. तर पंच म्हणून सुहास पाटीलदेखील रायगडचे नाव देशात पुढे नेत आहेत.

साळवींचे कबड्डी कार्य ऐकून अनेक थोर शासक व नेते कबड्डीच्या मैदानावर अतिथी म्हणून उपयोगी पडले. राष्ट्रपती वराह व्यंकट गिरी, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरुंच्या प्रेरणेने ४ मार्च १९५१ मध्ये नवी दिल्लीत नॅशनल स्टेडियमवर पहिल्या आशियाई कबड्डी क्रीडा स्पर्धांची मुहूर्तमेढ रोवली गेली. दिल्लीत ९ वी आशियाई स्पर्धा १९८२ साली पंतप्रधान इंदिराजींच्या बहुमूल्य सहकार्यामुळे झाली. ग.दि. माडगुळकरां सारख्या महाकवीने बुवांच्या धडपडीमुळे त्यांना कबड्डीतील अस्वस्थ माणूस ही उपाधी दिली. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, सेनेचे मधुकर सरपोतदार, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, तत्कालिन जलसंपदामंत्री अजित पवार, खासदार मोहन रावले, गजानन कीर्तीकर, सचिन अहिर, शेकाप नेते स्व. मंत्री भाई मोहन पाटील, आमदार जयंतभाई पाटील (अलिबाग), आमदार विवेक पाटील अशा थोरांचे सहकार्य शंकर साळवींना लाभले. आज रायगड जिल्ह्याचे शेकापचे जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील हे महाराष्ट्र राज्याचे सरकार्यवाह आहेत. शिहू हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक जे.जे पाटील हे रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाहक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाने आज रायगडमध्ये सुमारे २५६ च्या वर पुरूष संघ, तर महिला संघ कार्यरत आहेत. रायगडच्या या कबड्डीच्या ६९ वर्धापन दिनानिमित्त समस्त रायगडच्या खेळाडूंना शतशः प्रणाम. **

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)